
डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे
बोललो तर बोलाल की बोलतो

# न केलेली भाषणे

## [बोललो तर बोलाल की बोलतो!]

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# न केलेली भाषणे

# हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा. सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# न केलेली भाषणे

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान -:

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन :- २० मे २०२२

वैशाख पंचमी शके १९४४

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे अडतिसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

# न केलेली भाषणे

*[बोललो तर बोलाल की बोलतो!]*

अनुक्रम


**१. प्रस्तावना**
**२. कवी भ्रमरानंद यांचे पुस्तक प्रकाशन**
**३.ओसाडवाड बुद्रुक येथील कवीसंमेलन**
**४. विनोदकार संमेलन**
**५. विचार मौक्तिक माला**
**६. गगनरावांची प्रचारसभा**
**७. अखिल भारतीय विश्व विद्रोह संमेलन**
**८. ग्रामीण साहित्य संमेलन**
**९. फुटीर संमेलन**
**१०. साहित्य संमेलनाध्यक्ष पदावरून**
**११. आमचा साठी समारंभ**
**१२. जीवनगौरव पुरस्कार**
**१३. प्रस्तावना**

चारच शब्द

लेखकचा मोठेपणा वाढतो तसा मी पणा गळत जातो. तो स्वतःला मी ऐवजी आम्ही संबोधू लागतो. असा लेखकराव मग सर्व ठिकाणी भाषणे ठोकण्यास सज्ज होतो.. मी पासून आम्ही बनण्याचा हा प्रवास त्याच्या भाषणांना कच्चा माल पुरवतो.. अर्थात लेखक म्हटला की त्याच्या छोट्या नि मोठया मेंदूतून बाहेर पडणाऱ्या कल्पनांना काय कमी?

’न केलेली भाषणे ' हा एका लेखकाने न केलेल्या भाषणांचा संग्रह आहे, ही भाषणे झालीत किंवा होतीलच पुढे मागे असे समजून वाचावा!

डॉ. नितीन मोरे

प्रस्तावना

*न केलेल्या भाषणांचा हा संग्रह. तो वेळेआधीच प्रकाशित करावा का? तर हो! भाषणे तर तयार आहेत. पुढे मागे ती ठोकण्याची संधी मिळेल न मिळेल.. त्याआधी ती ऑन द रेकॉर्ड टाकणे श्रेयस्कर! हे आपले ऑफ द रेकॉर्ड!*

*पां.तु.पातोळेंनी आपल्याच संग्रहास लिहिलेली ही..*
प्रस्तावना

# आम्ही आणि आमची भाषणे.. एक प्रास्ताविक

आम्ही म्हणजे आम्ही आहोत. म्हणजे जगप्रसिद्ध जगद्विख्यात असे आम्ही. आम्हास सगळीकडून तशी मागणी असते, म्हणजे उद्घाटन म्हणू नका, संमेलन म्हणू नका, पुस्तक प्रकाशन म्हणू नका.. कशात आम्ही नाही? सगळीकडे भाषणांचा तडाखा लावणारे आम्ही. आमच्या या कानांत टाळया आणि हशांचा आवाज फुल्ल व्हॉल्यूममध्ये जणू रेकॉर्ड झाला आहे.

लेखकाचे असेच असते म्हणे. गंभीर काही लिहू गेल्यास तो तत्वज्ञ आपोआप गणला जातो. कुणास काही न समजेल असे लिहिणारा तर गाढा पंडित. त्या न्यायाने आम्ही या उतरंडीच्या अगदी पहिल्या पायदानावर आहोत म्हणावे. पण लोकांना हसवणारे हवेत. विदूषकांनाही मागणी असते इकडे. त्यामुळे आम्हा विनोदी लेखकांस तशी डिमांड असते.. लोकांना हसवून दाखवा.. करी मनोरंजन जो जनांचे.. त्याचे जडेल नाते कुणाशी ठाऊक नाही .. पण कमीत कमी

समोरच्या माईकच्या बोंडकाशी तरी आमचे नाते जुळले तरी बक्कळ आम्हास. गेले पंचवीस वर्षे मराठी साहित्य दरबारात विनोदाचा रतीब घालणारे आम्ही.. हसता हसता गाल दुखले .. कोणाचे पोट दुखले अशा गोड तक्रारी करणारे आमचे वाचक.. पुस्तकांच्या आमच्या राशींवर अंथरूण टाकून पहुडलेले नि त्यांच्या तडाखेबंद विक्रीतून पैशांचा पाऊस पडण्याचे स्वप्न रंगवणारे आमचे प्रकाशक.. गावोगावी आम्हास मग प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रण येते.. आम्ही लेखकसुलभ आढेवेढे घेत होकार देतो.. जाण्यायेण्याची नि जेवणाची सोय एवढ्या माफक अपेक्षांमुळे आम्ही लोकप्रिय आहोत असे आमचे साहित्यिक विरोधक म्हणोत.. त्यांच्या बोलण्याला भीक न घालता आम्ही आमंत्रणे स्वीकारतो. भाषणे करायची म्हणजे आमच्या रसवंतीला बहर येतो. पुढे कोण आहे एवढा अंदाज आला की आम्ही सुटतो.. आमच्या भाषणात आमचा नि हशा आणि टाळ्यांचाच फक्त आवाज आसमंतात भरून राहतो. मिळालेला हार तिथेच सोडतो आम्ही. एखाद्या ओढणीसारखी निरूंद शाल मात्र जपून ठेवतो. मिळालेले श्रीफळ दुसऱ्या दिवशी सोलकढी बनून आमच्या उदरात जाते .. अशा

कितीक शाली जमवल्यात.. कितीक सोलकढ्यांचे भुरके मारलेत आम्ही इतक्या वर्षांत!

कुणी म्हणेल लेखक .. सॉरी, लोकप्रिय लेखक असल्याचे भोग आहेत हे. खरेच आहे. आधी लेखक होण्याची नि मग लोकप्रिय होण्याची धडपड आमची. ती यशस्वी झाली .. आम्हाला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आमंत्रणे यायला लागली. प्रगतीशील महाराष्ट्रात गाव तिथे एस टी असल्याने आमची जाण्याची सोय ही झाली. आम्ही सर्वत्र संचारी असल्याने नि गावोगाव देशाटनातून आमच्या लिखाणाचा कच्चा माल गोळा करत असल्याने आम्ही नाही कुणास म्हणत नाही.. आमच्या घरून यास विरोध होतो. पायास भिंगरी लावून फिरता म्हणतात मंडळी.. पण आम्ही मनस्वी आहोत.. आधीच लेखक त्यातून मनस्वी .. रानोमाळ भटकावे तसे गावोगाव भटकतो आम्ही..

नवोदित लेखक कधी न कधी प्रथितयश होईलच. मी त्यास अपवाद कसा ठरेन? वर लिहिली ती माझ्या विविध भाषणांच्या पुस्तकाची प्रस्तावना. भाषणे व्हायचीत अजून. म्हणजे आता कुठे लेखक म्हणून लिहिलेल्या गोष्टी साभार परत

यायला लागल्यात संपादकांकडून. साभार परत ही म्हणायची एक पद्धत म्हणून. नाहीतर परत येणाऱ्या गोष्टींबद्दल बरे वाईट चकार शब्दही हे मराठी सारस्वतातील संपादक काढत नाहीत.. पण ते एक राहू देत. तर माझ्या कथा.. अजून पुढे छापून येतील.. मग पुस्तके येतील .. मग ती खपतील.. लोकप्रिय होतील.. एक ना दोन! हे होईल तेव्हा होईल. पण पुढची तयारी करून ठेवायला हवी. भविष्याचा विचार वर्तमानात केला तर भूत होण्याची वेळ येत नाही .. हा विचारमणी कम मुक्ताफळ माझ्याच एका गोष्टीतील विनोदी पात्राचा. ही माझी लिहिलेली गोष्ट अजून माझ्याखेरीज कुणी वाचली नाही हा भाग वेगळा पण त्यामुळे जनसमुदाय अशा चमकदार विचारांना मुकलाय. त्याला इलाज नाही. असो.

.. तर मी प्रस्तावना लिहून ठेवतोय .. आता काही भाषणं तयार ठेवायला हवीत.. प्रसंगानुरूप. केव्हा कुठून बोलावणे येईल नेम नाही. आपण तयारीत असलेले बरे!

पां.तु.पातोळे

२.

*मराठी सारस्वताच्या दरबारात स्थान मिळवायचे तर क्रिकेटरचा आदर्श ठेवायला हवा. म्हणजे नुसतेच गद्य लेखन किंवा पद्य लेखन नको. कथा, कविता, कादंबरी, नाटक, वैचारिक .. कधी अवैचारिक ही.. लिखाण करायला हवे. म्हणजे साहित्य दरबाराच्या टीम मध्ये टिकून राहता येईल. तेव्हा गद्य लेखन करता करता मधून मधून शब्द जुळार करायला हवा. तो करता करता कविता विश्वात प्रवेश नि मग कविसंमेलनाची वगैरे आमंत्रणे.. तयारी हवीच!*

१. कवी भ्रमरानंद यांचे काव्यसंग्रह प्रकाशन
२. ओसाडगावातील कविसंमेलन

# कवि भ्रमरानंद यांचे पुस्तक प्रकाशन

*(कवी नावाची जमात आहे, त्यात दोन प्रकार असतात, एक खरोखरचे कवी नि दुसरे स्वतःस कवी समजणारे कवी! जे न देखे रवि ते पाहात बसणारे नि आम्ही असू लाडके म्हणून स्वत:च स्वतःचे लाड करवून घेणारे. त्यातील काही शब्दजुळारी.. पुढे मागे साहित्य वर्तुळात रूळल्यावर प्रथितयश झालो की माझ्या सदऱ्याचे टोक पकडून पुढे येऊ पाहणारा कुणी कवी भेटल्याशिवाय कसे राहिल? तोच हा भ्रमरानंद. आज तो काल्पनिक आहे, पण नंतर सत्यात येईलच.. त्याचा काव्यसंग्रह प्रकाशित होईल.. अर्थातच माझ्या हस्ते.. तो भेटणे बाकी, माझे प्रथितयश होणे बाकी.. पण तेव्हा करावयाचे भाषण मात्र तय्यार आहे..)*

आज इकडे येताना चार विचार मनात आले. म्हणजे आम्ही आमचा वेळ काढून जरूर येऊ. म्हणजे तसे आलोच आम्ही. लाल गाडीतून उतरून खुर्डेवाडी बुद्रुक सारख्या ठिकाणी पोहोचलो. अंगावरील या पांढऱ्या शुभ्र कुरत्यावरील लाल मातीचे थर झटकून नि एस टी स्टॅंडवरील चहाचे गरम लाल पाणी घशात घालून पोहोचलो.. सारे सोपस्कार करून आम्ही आलो खरे. म्हणजे बघा आमच्या 'उघड भाव भावना' या आगामी विनोदी कादंबरीतील रोमहर्षक शृंगारिक भाग लिहिता लिहिता तसाच सोडून आमचे परममित्र भ्रमरानंद याच्या या 'कवळी पाती' काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून पोहोचलो .. आणि येता येता विचार आला.. स्वच्छंदी वृत्तीचा हा भ्रमर स्वतः पोहोचला असेल अथवा नाही .. की कुठल्या कमलदलांत आपल्या चित्तवृत्ती अडकल्या म्हणून गोड तक्रार करत स्वतःच्याच काव्यसंग्रहाच्या प्रकाशनास येऊ शकणार नाही? पण नाही. हा कवि आननी दिसतो कसा हे येथील उपस्थित रसिक काव्याग्राही समुदायास दिसण्याचा सुयोग आहे. त्यामुळे भ्रमरानंद आपली भ्रमंती सोडून येथे जातीने उपस्थित आहे हे आपले परमभाग्य

म्हणावयास हवे. आणि या कवळ्या पातींच्या संग्रहाचे विमोचन या गद्य लेखकाकडून व्हावे हा एक योगायोग म्हणावयास हवा. अर्थात गद्य आणि पद्य या साहित्यिक नाण्याच्या दोन बाजू आहेत हे आम्हीच हल्लीच कोठेतरी म्हटले आहे ते या संदर्भात खरेच म्हणावयाचे. फक्त ते नाणे खणखणीत वाजणारे हवे!

कवी भ्रमरानंदाची ओळख नव्याने करून द्यायला हवी असे नाही. म्हणजे जुनी ओळख पुसण्यासाठी नव्याने ओळख करून दिली जात असेल तर भ्रमरानंदाच्या ह्या पहिल्याच काव्यसंग्रहाच्या प्रकाशनात नवोन्मुख नि नवनवोन्मेषशाली प्रतिभेच्या या कविची नवी ओळख करून देण्याची गरज नाही. भ्रमरानंदास आज येथे कोण ओळखत नाही. म्हणजे कोण ओळखत नाही? येथील आमंत्रित सारेच भ्रमरानंदच्या प्रतिभासंपन्न कवितेने भारलेले आहेत. 'कवळी पाती' हा त्याचा पहिलाच काव्यसंग्रह प्रकाशित होत आहे. प्रेमभावनेतील विद्रोह जाणत तो आपल्या झरणीतून झरझर टिपणारा एक संवेदनशील प्रेमविद्रोह कवी म्हणून स्वत:ची ओळख भ्रमरानंद करून देतो.

वेगवेगळ्या जा◌ॅनरच्या वर्गीकरणात हा नवीन क्लास नव्याने इंट्रोड्यूस करणारा भ्रमरानंद वेगळयाच क्लासचा क्लासेस नि मासेससाठी काव्य लिहिणारा कवी आहे. अर्थात कवी म्हणून तो मस्तीत जगतो. विद्रोह प्रेम कवी असल्याने तो 'नाजूक नाती तुटकी पाती' सारखी ओळ लिहून जातो. परस्पर विरोधी भावनांचा खेळ त्याच्या ओळी ओळींतून जाणवतो. उदाहरणार्थ

'भीषण शांत शांत भयानक
तिकडून दिसलीस तूच अचानक'
सारखे गूढ त्याच्या पेनातून उतरते.
'टाका तोडून एकेक टाका
वाका वाका प्रसंग बाका'

असे रूढार्थी प्रेमकवितेत विशोभनीय असे काही तो सहज लिहून जातो तेव्हा त्याच्या संवेदनशील मनातील विद्रोह बाहेर झळकताना दिसतो. तीच लेखणी

'साजूक साजरी नाजूक लाजरी गोडुली गोजरी'

असे आपल्या प्रियेचे वर्णन करताना प्रेमरसात ओथंबून गेल्यासारखी वाटते. जुन्या काळी बोरूने लिहायचे लोक. प्रत्येक वेळी शाईच्या दौतीत बोरू बुडवला जायचा. आमचा

हा कविमित्र अशा दोन दौती घेऊन बसत असावा. कधी प्रेमरसशाईच्या दौतीत तर कधी विद्रोहभावरसाच्या दौतीत आपला काव्यबोरू बुडवून शब्दरूप देत असावा. भ्रमरानंदाचे हे वैशिष्ट्य समकालीन कवींत अभावानेच आढळते. म्हणजे एकतर जहाल विद्रोह दिसतो नाहीतर शुद्ध तुपातील प्रेम. पण ह्या दोहोंचा मिलाफ भ्रमरानंदाच्या कवितेत असा दिसतो की कधी हा भ्रमर कमलदलात अडकला तर त्यातूनही विद्रोह करत कमलदलांना उलगडत बाहेर येईल! तेही अलगद नाही तर धडधड धडक देत! त्यामुळे प्रेमकवितेतली नाजूक नि तलम मृदुमुलायम शब्दकळा नि विद्रोहातील ज्वलज्जहाल शब्दरचना यांचा पानोपानी प्रत्यय या 'कवळी पाती' संग्रहात येईल.

संग्रहाचे नामकरण 'कोवळी पाती' न करता भ्रमरानंद 'कवळी पाती' करतो यातच त्याचे वेगळेपण आहे. म्हणजे दाताच्या कवळीची आठवण दातओठ खाऊन केलेल्या प्रेमात यावी असे तर काही सुचवायचे नाही ना त्यास? त्याच्या प्रस्तावनेत प्रसिद्ध कवी मुरलीधर ऊर्फ पाईपवाला म्हणतात, प्रेमरसात असा गरम मसाल्यासारखा द्रोह त्यांनी आफ्रिकेतील सुदानी कवितेनंतर

प्रथमच इथे पाहिला. पाईपवालांचा आफ्रिकन कवितांचा गाढा अभ्यास आहे. या पन्नास पानी पुस्तकास पाईपवाला यांनी ही बावन्न पानी प्रस्तावना लिहून एकूण पुस्तकाच्या वजनात भर घातली आहे हे खचितच. भ्रमरानंदाच्या कवितेच्या रसग्रहणासाठी ही प्रस्तावना वाचणे गरजेचे आहे. किंबहुना पुढे मागे हा कवळी पाती संग्रह विद्यापीठात अभ्यासास लागला तर विद्यार्थ्यांची मोठीच सोय या प्रस्तावनेने केली आहे.

भरतकुमार आनंदे म्हणजे भ्रमरानंद आमचा विद्यार्थी. म्हणजे आमच्याच विद्यापीठातील. आम्ही मात्र त्यास दोस्तासारखे मानत आलो. एम.ए.च्या परीक्षेत पहिला आलेला भरत आनंदे.. तेव्हा तो भ्रमरानंद झाला नव्हता.. पुढे तो काव्यरूपी भ्रमर बनून पिंगा घालू लागला. आम्ही त्याच्या पाठीवर सदैव हात ठेवत आलो. भ्रमरानंदाच्या कवितेचा आनंद आज सर्व काव्यरसिकांना मुक्त हस्ते वाटण्याचा योग या संग्रहाच्या प्रकाशनातून येत आहे. एखाद्या गुरू साठी त्याचा शिष्य मोठा होण्याहून आनंदाची बाब ती कोणती असेल? तो आम्हास या निमित्ताने लाभला आहे. आमच्या ह्या शिष्योत्तम दोस्ताने

प्रकाशनासाठी प्रमुख पाहुणा म्हणून आमची आठवण काढली याहून अधिक आनंदाची गोष्ट ती काय असणार आहे? जाता जाता.. एखादे पुस्तक प्रकाशन आमच्या हातून होण्याची ही पहिलीच वेळ आहे. नवकवीच्या प्रथम संग्रहाचे प्रकाशन प्रमुख पाहुणा म्हणून प्रथमच आमंत्रण मिळालेल्या आमच्यासारख्या प्रथितयश लेखकाकडून व्हावे याहून दुसरा काव्यगत न्याय कुठला असेल? भ्रमरानंद कविता जगतो. उठता बसता कार्य करिता कविता त्याच्या मस्तिष्कात घर करून असते. अशावेळी न्याय देखील काव्यगत असणे.. स्वाभाविक नि साहजिकच म्हणावयास हवे!

आज या आनंदसोहळयाच्या निमित्ताने भ्रमरानंदाच्या गुंजारवाची सवय सर्व मराठी वाचकांना नि रसिकांना होवो. त्याच्या कवितेच्या कमलदलात काव्य रसिक गुंतून राहो.. ही सदिच्छा.

तुझ्या हातात घेऊन हात<br>
तुटोत तटतट अंधाराची पाती<br>
लक्ष लक्ष उजळू दे नंतर<br>
लाख दिव्यांची बिनतेलाने वाती

असा तेलाच्या वाढत्या भावाबद्दलचा विद्रोह प्रेम करता करता भ्रमरानंदासच सुचू शकतो नाही का? तर अशा या कवी भ्रमरानंदचा काव्य गुंजारव अव्याहत सुरू राहून त्या काव्यानंदसागरात रसिकांना यथेच्छ डुंबावयास मिळो .. त्याचबरोबर त्याच्या प्रेमविद्रोहास फळ येऊन समाजातील दुष्टाचे निर्दालन होऊन भ्रमरानंद वांछील असे प्रेम तो लाहो अशी अपेक्षा अन शुभेच्छा व्यक्त करत आम्ही हा कवी भ्रमरानंद विरचित कवळी पाती संग्रह प्रकाशित झाल्याचे जाहीर करतो.

# ओसाडगाव बुद्रुक येथील कविसंमेलन

*(मी प्रसिद्ध झालो. मी लिहिणारा लेखक.. गद्य की पद्य महत्त्वाचे नाही. झरझर चालणारी झरणी हाती असलेला कुणी .. तो मी. प्रसिद्ध नि लोकप्रिय. मग कविसंमेलनात बोलावणे ओघाने आलेच. लोक माझे विचार ऐकायला गर्दी करतात. कविसंमेलनाला गर्दी जमवण्यासाठी याहून सोपा मार्ग कोणता? हे होईल तेव्हाची जय्यत तयारी आजच करून ठेवावी.. तयार आहे माझे कविसंमेलनाच्या उद्घाटनाचे भाषण..)*

प्रिय कवी कवयित्री मित्रमैत्रिणींनो..

काव्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी माझ्यासारख्या गद्य लेखकास पूर्वग्रह सोडून आग्रहाने बोलावल्याबद्दल सर्व कविगणांचे आणि आयोजकांचे प्रथम आभार मानून पुढे जातो.

कवि केशवसुत म्हणून गेले तसे आम्ही असू लाडके अशा या देवाच्या लाडक्या आणि कदाचित पृथ्वीवरील यःकश्चित सामान्य जनांच्या दोडक्या कविवृंदासमोर उभे राहून हे भाषण करताना मला अतीव आनंद होत आहे. सामान्य जनांच्या दोडक्या म्हणण्याचे कारण .. आजवर कुठेही कोणासही कविता ऐकवणाऱ्या कविजनांची कुत्सितपणे हेटाळणी हा सामान्य जन करत आला आहे. ही गोष्ट आजची नाही. अगदी केशवसुतांसही त्यामुळे सर्वांना आम्ही असू लाडके म्हणून समज द्यावी लागली होती. अशा कविगणांपुढे माझ्या कवितेच्या चार ओळी म्हणून मी माझे भाषण सुरू करतो. तुम्ही म्हणाल, गद्य लेखकाने कविता करावी का? मी म्हणतो, का करू नये? एकच उदाहरण देतो.. कालच माझ्या घरच्या कामासाठी एका सुतारास बोलवावे

लागले. ते काम करता करता ध्यानी आले.. घरच्या उंबरठ्याच्या पट्टीस तडा गेला आहे. रामबहादुर सुतारास म्हटले, ये तुमसे होयेंगा क्या बाबा रिपेर? तो म्हणाला, क्यूं नहीं साब?

म्हणजे सुतार जर गवंड्याचे काम करू शकतो तर एक गद्य लेखक कवितेच्या ओळी का लिहू शकत नाही?

तर तुमच्यासारख्या कविगणांपुढे कविता म्हणणे म्हणजे दुधी भोपळयासमोर कोवळया काकडीने आपल्या तब्येतीची फुशारकी मारावी असे आहे ह्याची जाणीव आहे मला. पण तरीही अन्य कविगणांपासून स्फूर्ती घेऊन समोरच्याची इच्छा असो वा नसो कविता ऐकवणे हा धर्म आपुला समजून ह्या चार ओळी ऐकवत आहे.

हे कविगणांनो
लिहिते व्हा
गुलाब पाकळीसारखे
मऊ मुलायम सुगंधी
आणि मोगऱ्यासारखे
टवटवीत काही
बुडवून अत्तरदाणीत
लेखणीचे अग्र
सुवासिक ..

किंवा

हे कवींनो
लिहा आपल्या
लेखणीच्या अग्रास
शेगडीच्या ज्वालांवर तापवून
घुसू देत शब्द अब्द वेळा
काळजात कुणाच्या
चर्र चर्र ..

तेव्हा आपल्या तब्येतीप्रमाणे लिहीत रहा.. प्रेमकविता लिहा की विद्रोह करत लिहा.. निसर्गावर लिहा.. सृष्टीवर लिहा.. दृष्टीवर लिहा.. अंतरातील गहन गूढ विचारांवर लिहा .. गुलाबपुष्पासारखे मुलायम आणि शीतल किंवा तप्त अंगारभरीत काव्यरूपी लाव्ह्याचे अग्निकण या संमेलनात अनुभवास येतील यात मला तरी शंका नाही.

मी स्वत: कवी कवींत फरक करत नाही. त्यामुळे नॉन विद्रोही, जिलबी आणि गुलाब-जामसारख्या गोग्गोड कविता असोत की ज्वालामुखीसारख्या विद्रोही. कवी म्हणून

वाट्यास येणारे भोग सारखेच असतात. 'चला मुरारी कविता करने' आणि 'उठा मुरारी कविता सुनाने' अशी बदनामी कवीची व्हावी या सारखी खेदजनक बाब ती कोणती?

गद्य लेखक त्या मानाने कमी बदनाम आहेत. कुणी उठावे नि आपला गद्य उतारा धडाधडा म्हणावा असे होत नाही .. कवी आभासकुमार म्हणतात,

उघडून पाने पुस्तकाची
वाचल्या तू चार ओळी ..
चार ओळी काही शब्द
यातूनी जीवनाची खोळी..

मित्रहो.. कवीला हे लायसन्स आहे. शब्दांची तोडमोड, ऱ्हस्व दीर्घाचे बदलू शकणारे नियम.. खोलीला खोळी म्हणून अर्थाची खोळ घालण्याची सोय कवीला दिलीय. ही फॅसिलीटी गद्य लेखकाला नाही. गद्य लेखकाचे लिखाण त्यातील मजकुरास टोक आहे की नाही यावर जोखले जाते. म्हणजे लिखाणाच्या टोकाने कोणाला टाचणीसारखे टचकन् टोचल्यावाचून त्याची व्हॅल्यू लक्षात येत नसावी. कवीजनांचे तसे नाही. कल्पनेच्या साम्राज्यात मुक्त विहार.. हा

कवीचा कविधर्म आहे. दोन गोष्टी इथे सांगितल्यावाचून राहवत नाहीत..

एक.. मुक्त विहार. माझा कवीमित्र कवी ढासू .. हे त्याच्या कविमनाच्या अखंड झरणाऱ्या झरणीचे टोपण अर्थात टोपण नाव आहे.. एके ठिकाणी तो म्हणतो फक्त पक्ष्यांचाच मुक्त विहार का दिसावा?

इकडे तिकडे आणि चहूकडे
गबाळग्रंथी गलिच्छ वस्ती
कुणी म्हणावे का अशी असावी
जिनगानी कुणाची इतकी सस्ती
इकडून तिकडे गटार पाणी
त्यावरी चाले डुकरांची कुस्ती
त्यावर मुक्त अन् स्वच्छंदी
झुरळे मच्छर माशांची मस्ती

पक्षीच स्वच्छंद विहार करतात? मग डास अन माशांनी काय घोडे मारलेत? असे असते कविमन .. त्यास स्वच्छंदी माशा दिसतात. गटाराच्या काळया पाण्याची बक्षिसी मिळालेल्या डुकरांचे लोळणे कविमनास कुस्तीसम वाटते.. असे असते कविमन ..

त्यास प्रियेचे गाल गुलाबासारखे वाटण्याची नि त्यावर मोरपीस फिरवण्याची मोकळीक आहे नि या व्यवस्थेच्या खरखरीत गालावर आपल्या राठ हातांनी खरमरीत चपराक मारण्याचीही आहे. हा कविधर्म आहे. माझा दुसरा मुद्दा याच्याशीच संलग्न आहे.. कविधर्म. आजवर एकेका धर्माची चर्चा झाली.. गृहस्थधर्म, राजधर्म असे काहीबाही .. त्याबद्दल मला खोलात शिरायचे नाही. पण कविधर्माबद्दलचा नवा विचार मला इथे द्यायचा आहे. कविधर्म कोणता? समोरच्यास पकडून कविता ऐकवणे हा का कविधर्म? शब्द शब्द जपून न ठेवता त्यातून अर्थहीन असो वा अर्थशून्य.. अर्थगर्भ असो वा अर्थपूर्ण.. काहीही ऐकवीत जावे हा का कविधर्म? चहूबाजूस आयुष्याचा अर्थ सांगणाऱ्या गोष्टी दिसत असताना कविकल्पनेतून तो उलगडून दाखवणे हा का कविधर्म? आम्ही असू लाडके अशा गुर्मीत इतरेजनांना आपल्या ज्वलज्जहाल किंवा नाजूकसाजूक ओळी ऐकवणे हा का कविधर्म? या इथे, या कवीसंमेलनाध्यक्ष्याच्या खुर्चीवरून मी ऐलान करत आहे.. कविधर्म या सर्वांचे मिश्रण आहे. एकजीव आणि एकसंध. एकदा का कुणी कवी झाला की तो आयुष्यभर

कवी राहतो .. तो कविधर्माचे पालन करीत साऱ्या दुनियेस काव्यमय करीत जाण्याचे कविस्वप्न पाहतो. स्वप्न रंजन करतो.. क्षण कुठला नि प्रसंग कुठलाही असो, प्रसंगोपात्त नि प्रसंगोचित अशा ओळी आपल्या झोळीत घेऊन फिरतो नि अशा प्रसंगी डोळयांवर जाड भिंगाचा चष्मा चढवून अर्धवट वाढलेली दाढी खाजवत नि अस्त्यावस्त केसांतून हात फिरवत त्या ऐकवू लागतो.. तो खरा कवी आणि तोच त्याचा कविधर्म!

हा नवविचार या निमित्ताने मी इकडे देत आहे.

थोडक्यात कविकल्पना हे तुम्हा कवी कवयित्रींचे चरायचे कुरण आहे. हवे तसे हुंदडून हव्या तशा आणि हव्या तितक्या शब्दांच्या हिरव्याकंच तृणपात्यांचा चारा गोळा करीत नि त्या कल्पनांच्या गवताच्या गंजी रचीत, यमक जुळवीत वा कधी यमकाची तमा न बाळगत कागदावर उमटवल्या जातात त्या ओळी म्हणजे कवीच्या अंतर्मनातल्या भावभावनांचे चित्रण. ही माझी कवितेची व्याख्या आहे. आजवर कविगण कविता लिहिण्यातच मश्गुल आहे. त्याने कवितेची व्याख्या केली नाही. ती

आज हा गद्य लेखक करीत आहे. फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. मराठीतील सात प्रथितयश मासिकांनी माझ्या कविता छापण्यास नकार दिला होता. खरेतर कवितेस जागा ती किती लागते छापावयास? पण ते असो. त्याच लेखकानी कवितेची व्याख्या करावी.. हा काव्यगत न्यायच नव्हे का? तर त्या भावभावनांचे शब्दातून काढलेले चित्र म्हणजे कविता. ते सुंदर असेल, सुरूप असेल किंवा कुरूप असेल.. त्यात कधी मनोमीलन असेल तर कधी संघर्ष असेल .. कधी ते उदात्त असेल तर कधी संकुचित आणि अनुदार मनाचे प्रदर्शन असेल.. यमक जुळो अथवा न जुळू दे.. कविता करीत जाणे.. हेच कवीचे जीवनगाणे आहे असे मला वाटते.

कुणी म्हणेल कवीचे व्यवच्छेदक लक्षण कोणते? कवी कसा ओळखवा? कवी तो दिसे कसा आननी? आननी कसा दिसेल याची छाननी जरा कठीण आहे.. पण कविता करतो तो कवी म्हटले की कवी ओळखू यायला हवा. केशवसुतांची प्रतिमा वापरायची तर ज्यांना वगळून तारांगणे गतप्रभ होतील ते म्हणजे कविवृंद. पण मी स्वतः कवीमन आणि

कविकल्पना यावर आधारित एखाद्याची कवीवर्गात भरती करतो. आधी म्हटले त्याप्रमाणे कविकल्पना हे चरायचे कुरण असेल तर कवी रूपी गौ आणि वृषभांनी तो रवंथ करून कवितारूपी गोमय निर्माण करणे अपेक्षित आहे. ते सारे कवीमनावर अवलंबून आहे हा अजून एक वेगळा भाग. अशा गोमयाची सतत निर्मिती करणारा तोचि कवी ओळखावा.. असे म्हटले तर वावगे ठरू नये.

भाषणाच्या शेवटाकडे येताना एक प्रश्न.. तो म्हणजे कवितेचे प्रयोजन काय? मी कित्येकांस हा प्रश्न विचारला आहे. माझे मित्र कवी भ्रमर यांच्या 'कविता: एक प्रयोजन' या पुस्तकातील कवितेचे प्रयोजन हे आनंद निर्मिती आहे सांगणाऱ्या चार ओळी पहा..

चेहऱ्यावरचे त्याच्या
उदासीनतेचे शेवाळ
ओरबाडून कुरतडून काढून
लावलीस तिथे
आनंदाची हिरवळ

मनातल्या शब्दांना
लावलेस तू कवितेच्या कुंडीत
वाढू दिलास मग तो वृक्ष
डेरेदार
पांथस्थांना छाया देण्यासाठी!

आणि माझे दुसरे मित्र कवी भ्रमिष्ट म्हणतात,

कसला आनंद
कसले काय
जीवन बघून
पळते पाय..
कविता माझी
उमटत जाय
कुणास तिची
पर्वा नाय..

त्यामुळे व्यक्ती तितक्या प्रकृती म्हणतात तसेच कवी तितके कवितेचे प्रयोजन असावे का?

असो. अजून वेळ न घेता शेवटी कवीगणांकडून काय अपेक्षा आहेत ते सांगून मी समारोप करतो.

कवीकल्पनांचे
उघडा दुकान

काव्य कवितेचे
येथ तुफान

काव्यमय सारे
जग काव्यमय
कुणा कवीला
नसे इथे भय

उडवीत उडवीत
काव्यतुषारा
वाहवीत रहा
काव्याच्या धारा

बनेल मग
काव्याची सरिता
कुणा न येई
ती अडविता

काव्य प्रपात
कोसळेल मग
काव्य सागराचे
बनेल हे जग

सगळे काही
येथ कविता
राज्य करी बघ
तोच कवी अता

आज मी माझ्या कवी मित्रमैत्रिणींना माझ्या अनुभवाचे निरीक्षणाचे अन् आपुलकीच्या सल्ल्याचे काही बोल ऐकवले आहेत. या आसमंतात जमलेल्या आपण सर्व कवी कवयित्रींच्या चमकत्या तारकादळांनी माझ्यासारख्या मिणमिणत्या दिव्यास ही संधी दिली याबद्दल परत एकदा आभार. जय मराठी! जय महाराष्ट्र!

३.

विनोद आणि विचार!

*कोणालाही विचारा.. विचार आणि विनोद यांचा तसा अन्योन्य संबंध आहे का? ओढून ताणून जोडला जाऊ शकतो का? एक विदूषक विद्वान म्हणून गणला जाऊ शकतो? असल्यास तोच एक मोठा विनोद होऊ शकेल का?*

*पण यावर एक मार्ग आहे!*

*विनोदकाराने विचारवंत म्हणून भूमिका मांडावी का.. हे विचारण्या ऐवजी*

*विचारवंतांनी विनोद करावा का?*

*असा प्रश्न विचारणे श्रेयस्कर!*

*याचे उत्तर तरी होकारार्थी येईलच!*

*थोडक्यात दोन्हींची तयारी महत्त्वाची!*

१ विनोदकार संमेलन

२ विचारमौक्तिक माला

# विनोदकार संमेलन

*(साहित्याच्या अनेक फांद्या आहेत. गंभीर आणि विनोदी ह्या मुख्य फांद्या धरल्या तर विनोदी साहित्याच्या पारंब्यांना लोंबकळणारे मी आणि माझ्यासारखे अनेक. साहित्य दरबारात मानाचे पान मिळण्याची सुतराम शक्यता नसलेले. मग आम्ही सगळ्यांनी विनोदकार संमेलन आपले आपणच भरवले तर? भरवले जाईल तेव्हा मी मात्र तयारीत राहिन. स्वागताध्यक्ष म्हणून माझे छोटखानी भाषण आजच तयार आहे..)*

नमस्कार मित्रांनो,
आज इथे या मंचावर स्वागताध्यक्ष म्हणून उभे राहताना आम्हाला आनंदाच्या उकळया फुटत आहेत. कुणास ह्या उकळया येथील अत्यंत गरम हवामानामुळे आहेत असे वाटले तर त्यास आमचा इलाज नाही. पण विनोदी साहित्यिकांचे हे गंभीर संमेलन भरवण्याची कल्पना ज्यांना सुचली ते अभिनंदनास पात्र आहेत. येथे उपस्थित पेपरवाल्या पत्रकारांनी हे वाक्य आयोजक म्हणजे एक पात्र आहेत असे लिहू नये.. कारण आम्ही तसे बोललो नाही आणि बोलूनही तसे बोललो नाही म्हणावयास किंवा आमच्या बोलण्याचा विपर्यास केला म्हणावयास आम्ही काही (अजूनतरी) राजकारणीही नाही.

मित्र हो,
विनोद कुठे नाही? खन्नांच्या विनोदने सिनेमा सृष्टी गाजवली.. पण तो विनोद म्हणजे आपला विनोद नाही. जळीस्थळी सगळीकडे चराचर व्यापून विनोद भरून राहिला आहे. आपले नेते आपल्याला याबद्दल मार्गदर्शन करत असतात. सरळ चेहरा ठेऊन आश्वासनांच्या विनोदी पिचकाऱ्या कशा माराव्यात, हे त्यांच्याकडून शिकावे. या आद्य विनोदवीरांसमोर आपण लेखक

मंडळी कधीही फिके पडू. तरीही नेटाने विनोदी लिहिणारे आपण सारे..

- तर मित्रांनो, विनोदी लेखकांच्या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधून घेण्यासाठी आपण सारे येथे जमलो आहोत. विनोदी लेखकांचे गंभीर संमेलन हाच एक विनोद असे कोणी भले म्हणोत.. पण केव्हा न केव्हा गंभीर बनणे आवश्यक आहेच.. कारण सर्व विनोदी लेखकांची हीच एक प्रमुख समस्या आहे. म्हणजे विनोदी लिहिणे ही समस्या आहे असे नाही. पण आपल्याला गंभीरपणे कोणी घेत नाहीत ही आमची खंत आहे. आम्हाला शाळा का ॅलेजात बोलावतील. पोरांचे मनोरंजन करून प्रभूशी नाते जोडावयास लावतील. अगदी अडलेला आयोजक असेल तर कुठल्याशा उद्घाटन समारंभास प्र.पा. म्हणजे प्रमुख पाहुणा म्हणून बोलावून आमच्याकडून लाल फित कापून घेईल. अशा ठिकाणी लाल फित कापावयास लाल दिव्याच्या गाडीतली कोणी जास्त योग्य, पण कार्यबाहुल्याने आमदार नामदार उपलब्ध नसतील तर आमची वर्णी लागेल. तशा आमच्या अपेक्षा जास्त नसतात नि आयोजकांच्याही आमच्याकडून जास्त अपेक्षा नसतात. त्यामुळे ही समतोल देवाणघेवाण असते. पण एखाद्या गंभीर

अशा प्रसंगी आम्हाला मार्गदर्शनपर चार शब्द सांगायला बोलावतील? प्रश्नच उद्भवत नाही. विदूषकाने विदुषकी वेशातच सदानकदा राहावे, नि उगाच आपले जीवन विषयक ज्ञान पाजळू नये इतकी माफक अपेक्षा सगळयांची असते. अर्थात खरे सांगायचे तर आमची स्वतःचीही आमच्याकडून हीच अपेक्षा असते! वेश बावळा परिधान केला की अंतरीच्या ना ना कळा नाही म्हटले तरी लपवता येतात!

तरीही आजच्या ह्या स्वागतप्रंसगी येथे खेदाची एक बाब नमूद करावीशी वाटते.. या विनोदकार संमेलनाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे कोण किंवा या संमेलनास अध्यक्ष कोण याबद्दल विशेष वाद विवाद झडला नाही.. आणि आपण सारेच विनोदवीर असूनही जनतेस अशा विनोदास मुकावे लागले. अतिशय खेदजनक बाब आहे. नाहीतर हाणामारी नि खडाजंगी शिवाय संमेलनास ती मजा येत नाही. आपले मी पण हरवण्यासाठी आयुष्यभर हिमालयात राहून कुंभमेळयात परतणारे साधुबैरागी एखाद्या कच्च्या फळापरी चिकटलेले त्यांचे मी पण दाखवत प्रथम स्नानाचा मान मिळवण्यासाठी झगडतात, तसे दिग्गज साहित्यिक अध्यक्षपदाच्या कुस्तीत आपल्या

जीवनविषयक जाणिवा किंवा उणीवा जनतेस प्रदर्शित करून चाराठ दिवस करमणूक घडवून आणतात. एखाद आठवडाभर पेपरवाल्यांना बातम्या पुरवतात. तसे करमणूक प्रधान काही आपल्या विनोदकार संमेलनाच्या निमित्ताने होऊ नये.. ही अतिखेदाची बाब आहे.

असो.

तर असे गंभीर संमेलन भरवणारे आयोजक अभिनंदनास पात्र आहेत. या येथील संमेलनात आपल्या भावनांचा निचरा करून आपण सारे नव्या जोमाने विनोद निर्मितीत उतरू. जनसामान्यांस हसवण्याचा आपला धंदा परत सुरू ठेऊ. अर्थातच सर्व प्रकारची काळजी घेत. कारण अस्मितताई नि भावनाबाई नामक दोन अति हळव्या बहिणी आजकाल आपल्याकडे वास्तव्यास आहेत. एकीस धक्का लागला की दुसरीच्या डोळा पाणी टचकन भरून आलेच. एकीने डोळे वटारले की दुसरी लगेच अंगावर धावून येतेच. तेव्हा आम्हा पामरांनी विनोद विषय कोणास निवडावे? फट म्हणता ब्रह्महत्या व्हावी तशी अस्मिता नि भावना या दुकलींची प्रतिक्रिया काय होईल? कोणाबद्दल लिहिले की कोण दुखावेल? अगदी सतराव्या शतकातील

कोणाबद्दल लिहावे तरी इकडे इतिहास (फक्त) ऐकून माहिती असणारे चवताळून उठतील. साधेच उदाहरण घ्या. विनोदी पात्र म्हणून कोणाचे नाव काय ठेवावे? कथानायक गणपतराव बावळट दाखवला की समस्त गणपतराव मोर्चा काढतील.. एखाद्या ललिताबाईस खडूस दाखवले की सगळ्या ललिता लाटणी घेऊन लालित्यपूर्ण प्रहार करतील.. आम्हाला तर भीती आहे की पुढे मागे बीजगणितीय भाषेत पात्रांची क्ष य किंवा अ ब क अशी नावे ठेवावी लागतील की काय? थोडक्यात काय तर तळहातावरच्या फोडाला जपावे तसे आम्हीच स्वतःस जपायला हवे. खुद सलामत तो विनोद सत्राशे साठ, हो की नाही?

असो. तर आपणा सर्वांच्या सर्व समस्यांचा उहापोह या संमेलनात होईलच. संमेलनातून समस्यापूर्तीची अपेक्षा ठेवणे हा कोणास विनोदविषय भले वाटो, आपणा विनोदकार साहित्यिकांस आपली वाट आपणच धुंडाळावयाची आहे. हा मात्र विनोदाचा विषय नाही!

आज पहिल्या विनोदकार संमेलनात याची सुरूवात होत आहे.. येथे आम्ही सर्व उपस्थितांचे स्वागत करतो..

**'विचार मौक्तिकमाला'**

*(विनोदी झाला लेखक म्हणून तोच विनोद विषय बनावा? त्याने लोकांना स्मित हास्यापासून फिदी फिदी गडगडाटी हास्यापर्यंत विनोद सर्व्ह करावे.. लोकांनी ते पाहून कोणीतरी दु:खी आहे बिचारा .. म्हणून सर्वांना हसवतोय असा विचार करावा.. होय, विनोदकार अंतर्यामी दु:खी असतो असे पब्लिक ओपिनियन आहे म्हणतात.. पण इथवरच सगळे संपते. जीवनाच्या खोलवर गेलेल्या मुळांतून हा आयुष्यवृक्ष बहरताना त्यास अर्थाची सुमधुर फळे कशी लावावीत.. किंबहुना आयुष्याचा अर्थच काय.. असले सारे मार्गदर्शन त्याच्याकडून अपेक्षित नाही. असल्या सगळ्या विभागांतून विनोदकारांची अघोषित हकालपट्टी अपेक्षित आहेच.. पण विनोदकार संमेलनानंतर विचारमौक्तिक माला करण्याचे ठरले. आपली किंमत आपल्यालाच वाढवावी लागते हे ओळखून.*

*या विचारमौक्तिकमालेतील हे पहिले भाषण..)*

उपस्थित श्रोतेवर्गास नमस्कार ..

आयोजकांनी याहून जास्त गर्दी अपेक्षित नसल्याचे सांगितल्याने आम्ही आमचे नियोजित भाषण सुरू करावे असे सांगितले आहे. त्यास अनुसरून आम्ही आमचे हे ज्वाज्वल्य विचारांनी संपृक्त असे काही विचार मोती वेचणार आहोत.

जनहो, काय कोण वेचतो यावर त्याची ओळख, आयडेंटिटी ठरते.. साधे दाणे, कृमीकीटक चिमण्या, कोंबड्या नाहीतर कावळे टिपतात.. आम्ही मांडतो आहोत तो विचार मौक्तिकांचा चारा, तो राजहंसच टिपणार! थोडक्यात टिपल्या जाणाऱ्या दाण्यांतून एखाद्याची ओळख पटते. आम्ही, म्हणजे ज्येष्ठ साहित्यिक पां.तु.पातोळे यांच्या विचार-मोत्यांचा चारा टिपणारा श्रोतृवृंद राजहंसांचाच असणार .. आणि तो चिऊकाऊ सारखा संख्येने विपुल नसणार हे ओघाने आलेच. त्यामुळे संख्येपेक्षा गर्दीची ग्रहणक्षमता महत्त्वाची. किंबहुना ग्रहणशक्ती असणाऱ्या दर्दींची गर्दी महत्त्वाची. आणि पूर्वी नुसत्या लाकडाच्या काठीस पाने फुटल्याचे आपण ऐकले आहे. तेव्हा आमच्या जाज्वल्य

विचारांच्या खतपाण्याने या येथील लाकडी खुर्च्यांस पालवी फुटणारच नाही असे नाही! विचारांस नवे धुमारे फुटण्याच्या मिषाने आज येथे उपस्थित निवडक श्रोतृवृंदास आमचा मन:पूर्वक नमस्कार.

आज आम्ही इथे आमचे काही खास विचार मांडावयास उपस्थित आहोत. गेली कित्येक वर्षे मराठी शारदेची सेवा केल्याने आम्हाला हा अधिकार प्राप्त झाला आहे. सेवाज्येष्ठतेमुळे सरकारी कारभारात गाढवासही घोड्याआधी बढती मिळते असे आमच्याबद्दल कुत्सित टीकाकार कदाचित म्हणतील. अर्थात टीकाकार म्हटल्यावर तसा तो त्यांचा अधिकार आहेच. तेव्हा आम्ही आमच्या अधिकाराचा आधिकाधिक वापर करून जनमानसात आमची विचार परिलुप्त अशी व्याख्याने देण्याचे योजिले आहे. त्यातील हे प्रथम पुष्प गुंफत आम्ही ही विचारमौक्तिक माला जनता जनार्दनाचरणी वाहणार आहोत. येथे जनता जनार्दन म्हटल्याने आम्ही कोठल्या निवडणुकीत नशीब आजमावणार असल्याचा कोणास संशय आला तर नि:संदेहपणे आम्ही त्याचा इन्कार करतो.

आणि हा कोण्या राजकारण्याचा इन्कार नसल्याने त्यावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही!

आम्ही तसे कुणी गंभीरपणे घ्यावे असे लेखन करण्यासाठी मशहूर नाही. पण लेखन करण्यासाठी प्रसिद्ध आहोत. पदरास खार लावून आम्ही साहित्य प्रसवत आलो आहोत. नवनिर्मितीची आस ही सहज अंत:प्रेरणा असली तर सारे काही सहजसाध्य होते. हा आमचा पहिला विचार मोती.

एखाद्या चिमणीच्या पिलाने घरट्यातून डोकावून पहावे तसा मनाच्या अंतर्मनातून विचार डोकावून पाहू लागतो.. पिलास चोचीत चारा हवा असतो. आम्हास वि चारा.. म्हणजे विचारांचा चारा. त्यातून आकारास येणाऱ्या कल्पना आणि आणि त्या कल्पनेतून आकारास येणारे नवे विश्व.. त्यातील पात्रे आणि त्यांचे आपसातील संबंध .. वगैरे साहित्य सृष्टी वसवताना डोळ्यांपुढे असते. तिच्यातूनच हा डोलारा उभा राहात असतो. डोंबाऱ्याने काठीवर तोल सांभाळावा तसा तोल सांभाळत साहित्यसृष्टीचे सृजन करावे.. एक विचार व्यक्त व्हावा नि संक्रातीस वाण वाटावे तसा वाटत जावा.. हे साहित्यिकाचे भागधेय आहे असे आम्हाला वाटते. मग तो विचार कसा मांडला जातो यापेक्षा तो विचार काय हे जास्त अहम

मानणे आवश्यक आहे असे आमचे मानणे आहे. त्यामुळे आमच्या हसविणाऱ्या गोष्टींतून आम्ही बहिर्मुख वाटलो तरीही काही अंतर्मुख व्हावे असे गवसू शकते. फक्त शोधावे म्हणजे सापडेल.

थोडक्यात हा आमच्या विचारमालेतील दुसरा मोती आहे. म्हणजे साहित्य निर्मिकाने साहित्य भूमीत उपजवलेल्या शब्दपिकांतून निके सत्व शोधून काढणे हे एका सच्च्या रसिकाचे भागधेय मानले जावे. वरवर वाचनातून कित्येक बाबी नजरेआड होत असताना, एखाद्या घारीसम नजर ठेऊन नेमका दडलेला विचार शोधून तो ध्यानात घेणे हे दर्दी रसिकाचे कर्तव्य आहे असे आमचे मानणे आहे. साध्याही विषयात आशय मोठा किती आढळे म्हणताना एखाद्या मधुपासम तो आशय मकरंद टिपण्याची वृत्ती रसिकाठायी हवी,

.. अर्थात त्यासाठी त्यास आपल्या नांग्या तीक्ष्ण बनविणे जरूरी आहे. अर्थात आपापल्या नांगी तीक्ष्ण करणे याचा संबंध कोणाची नांगी ठेचण्याशी लावण्याची गरज नाही!

हा आमचा अजून एक विचार-मोती आहे.

यास आम्ही रसिक वाचकाची स्व-मशागत असे संबोधतो.

वाचकाने वाचत राहणे आणिक त्यातून मनोभूमिका बनवत साहित्य भूमीतील पिकांची पारख करणे, त्यांची पुढे कापणी, झोडणी, निंदणी वगैरे जमिनीच्या व पिकाच्या प्रतीनुसार आणि योग्यतेनुसार करणे हे तितकेच आवश्यक आहे असे आम्ही मानतो. या सर्वा अंती साहित्यातून विचारांनी भरलेल्या टपोऱ्या दाण्यांची मनाच्या गोदामात साठवण करणे हा वाचकाच्या वाचनातील शेवटचा टप्पा समजता येईल.

आमचा विनोद हा इतरांस हसवण्याबरोबरच स्वतःवर हसावयास शिकवतो. त्यास कुणी मग विनोदी म्हणा, इनोदी म्हणा वा हास्यास्पद म्हणा! तमाम लेखनकर्मी व लेखणीजीवी वर्गास आमचे हेच सांगणे आहे. लेखणी परजवीत लिहित रहा. परजीवी होण्याची इथे गरज नाही. लेखणी परजवण्याची आहे. मग दुनियेची चिंता किंवा दुनियेच्या मताची चिंता करू नका. टीकाकार या जमातीस तर मुळीच घाबरू नका. त्यांस चार बुके अधिक कळत असेलही परंतु त्यामुळे नाउमेद होऊ नका. आपण नाकासमोर वाट दिसेल असे सरळसोट चालत राहावे. लेखणी सरळ पकडून लिहित रहावे. आणि वाचकांनी ते वाचत रहावे.

वाचन मनन चिंतन यांतून मनोभूमिका घडत जाते. ती कुंभाराने मडक्यास आकार द्यावा तशी घडवत रहावी. दिसामाजी चार दोन शब्द कागदावर उतरवत जावे. वाचक नामक दुर्मिळ जात भेटो वा न भेटो.. लिहिणाऱ्याने लिहित जावे.. आणि वाचकांनी.. वाचता वाचता एक दिवस लिहिणाऱ्याची लेखणी घ्यावी.

असो.

तर श्रोतेहो!

आमच्या वरील विवेचनावरून आम्ही क्लिष्ट, अर्थपूर्ण परंतु समजण्यास कठीण असे बोलू लिहू शकतो. एक नरम मऊ विचार आम्ही कठीण टरफलांच्या आवरणात बांधून मांडू शकतो हे पुरेसे सिद्ध झाले असावे. ती टरफले मोडणे हे काम ज्याने त्याने करावे!

आता तरीही वरील विवेचनाचा अर्थ काही शब्दांत मांडायचा झाल्यास ..

मनातील विचार कागदावर उतरवणे हे लेखकाचे काम, बरे वाईट काय ते ठरवणे हे वाचकांचे, नि टीका करणे हे टीकाकारांचे. वाचकांनी एका डोळ्याने वाचून दुसऱ्याने सोडून न देता थोडा विचार आत्मसात करावा..

हेच आमचे म्हणणे आहे!

हुश्श!

कठीण क्लिष्ट आणि गंभीर काही लिहिण्याहून गड्या आपला विनोद बरा एवढे आम्ही यातून शिकलो. तरीही विचार मोती हे गंभीर भाषेतच उधळावे लागतात हे आम्हास ठाऊक असल्याने आम्ही इकडे उपस्थित जनसमुदायास त्या विचार मौक्तिकांचा चारा खाऊ घालून.. आता हे प्रथम पुष्प गुंफून झाल्यावर .. पुनश्च वेश असावा बावळा हा अवतार धारण करण्यास सज्ज आहोत..

४.

# आम्ही लटिके ना बोलू!

*नो कमेंट्स!*

१. गगनरावांची प्रचार सभा

## गगनरावांची प्रचार सभा

*(यशस्वी पुरूषामागे स्त्रीचा हात असतो म्हणतात. तर यशस्वी साहित्यिकामागे कुण्या नेत्याच्या हाताची गरज असते म्हणतात. आता साहित्यिक यशस्वी झाला की हात पाठीशी पडतो की हात पडला की साहित्यिक यश लाभू लागते.. हा भाग वेगळा. तर ते काही असो. एका हाताने घेताना दुसऱ्या हाताने द्यावे लागतेच. माझ्या मागे उभे असणारे काल्पनिक आमदार गगनराव नि त्यांच्या मतदारसंघात साहजिकच प्रचार करणारा मी.. भाषण तयार आहे. एका गगनरावांचा हात पाठीवर पडणे बाकी आहे इतकेच!)*

रामराम मंडळी.

खडकपुरीच्या मतदार बंधू आणि भगिनींनो.. रामराम! नामदार गगनराव अतिकोरे पाटील, म्हणजे आपले सर्वांचे अति लाडके कार्यसम्राट, हृदयसम्राट आणि खडकपूरसम्राट आणि खडकपुरीच्या भूत वर्तमान नि भविष्याशी आपले आयुष्य ज्यांनी अखंडपणे जोडून घेतले आहे असे विद्यमान आमदार गगनराव, त्यांच्या सभेची सुरूवात माझ्यासारख्या अराजकीय व्यक्तीने करावी .. थोडे विचित्र वाटेलही. पण गगनराव अन मी यांचे हे नातेच असे घट्ट आहे. का ॅलेजापासून आम्ही दोस्त. सर्दी त्यांना व्हावी तर शिंक मला यावी.. अभ्यास त्यांनी करावा.. गुण मला मिळावेत.. त्यांचे आयुष्य जगावे त्यांनी नि त्यांचे आत्मचरित्र मी लिहावे .. पुस्तके मी लिहावीत.. त्यांनी त्यांस वेगवेगळ्या साहित्यिक मंडळांची बक्षिसे मिळवून द्यावीत.. अगदी स्वार्थ काहीही नसताना. अशी गहरी दोस्ती आमची. पुढे गगनरावांच्या करीयरचा पतंग गगनात उंच उडाला. मी मांजाची फिरकी हाती धरून जमिनीवरून शांतपणे पाहात होतो. गगनरावांचे

कर्तृत्व गगनास भिडले. गगनराव हे नाव सार्थकी लावत जनसेवेच्या व्रताने झपाटून गगनराव राजकारणात सत्तेच्या शिड्या चढत कर्तृत्वाने आकाशापर्यंत पोहोचले.

पण आज खरेतर आपल्या सर्वांसमोर त्यांच्यासाठी मते मागायला मी हात जोडून उभा नाही. गगनराव म्हणतील.. मी उभा आहे! नि मी म्हणेन, मी हात जोडून उभा आहे! पण हे सारे मत मिळावे म्हणून नाही. या खडकपुरातील एकही खडक असा नसेल ज्यास उद्धरण्याचे महत्कार्य गगनरावंकडून झाले नसेल. त्यामुळे त्यांच्यासाठी मत मी काय मागणार? खडकपुरातील जनता सुज्ञ आहेच. त्यामुळे गगनराव गगनभरारी त्या जोरावर मारू शकतात. त्यासाठी मी मते मागावीत असे नाही. अर्थात दहा वर्षांपूर्वी गगनराव तिकडे हिरवेगावातून निवडणूक हरले.. तेव्हा त्यांचा त्या गावावर झालेला कोप नि खप्पा मर्जी जनतेने अनुभवली आहेच. तेथील जनतेचे पाण्यावाचून झालेले हाल अन लपंडाव खेळणाऱ्या विजेमुळे झालेली हालत.. हिरवेगाव अजून विसरले नसणार. मला खात्री आहे खडकपूरवासियांना असा अनुभव घेण्याची इच्छा नसेलच. असो. एकूण तशी जनता सुजाण असते नि आपल्या

भल्याबुऱ्याची जाण तिला असतेच असते असा माझा अनुभव आहे. गगनरावांसारखा उमदा उमेदवार नाकारून आपल्या गावाचे अकल्याण करणे तीस परवडणारे नाही हे ती जाणते. त्यांचे विरोधी हणमंतराव पाटील नि त्यांचे बाहुबली कार्यकर्ते कम गुंडांस आवरण्यास इथे गगनरावच हवेत.. लोहा लोहेको काटता है म्हणतात तो न्याय इथे लागू होतोच. असो. माझ्याच एका कवितेत मी म्हटले आहे

**'छुरी है, छुरा है, धोखा सब जगह बाकी होता है**
**यारों! समझनेवाले को इशारा काफी होता है!'**

असो.

गगनरावांची नि माझी मैत्री जुनी असली तरी आता स्नेहसंबंध त्याहूनही खोल आहेत. राजकारण हे सर्व जग व्यापून दशांगुळे वर राहात असताना साहित्य विश्वातील अनुभवांत गगनरावांसारखा मातब्बर राजकारणी आपल्या बाजूने उभा असण्यासारखी सिक्युरिटी दुसरी नसावी. त्याच जोरावर माझी आजवर इथवर वाटचाल झाली आहे. शिक्षणमंडळात आजवर अशिक्षित सभासदांची वहिवाट असताना त्यास अपवाद करत त्यांनी एका मंडळावरून सेवा करण्याची संधी मला दिली. विद्यापीठातील मराठी

विषयासाठी माझा विनोदी कवितासंग्रह 'गुदगुल्या' अभ्यासक्रमात लागावा यासाठी त्यांनी केलेले परिश्रम मी तरी विसरून कसे चालेल? खडकपुरातील गेल्या साहित्य आक्रोश संमेलनाच्या अध्यक्षपदाची माझ्या गळयात पडली तेव्हा त्यांनी त्यासाठी आटवलेले रक्त कसे विसरणार? साहित्य आणि संस्कृती यांचा विसर न पडू देणारे सुसंस्कृत राजकारणी अस्तंगत होत असताना गगनरावांसारखा विद्याविभूषित आमदार होताना पाहणे हे अत्यंत समाधानकारक आहे. गगनराव म्हणतात, पाच वर्षांची त्यांची डिग्री. परत परीक्षेस बसावे लागेल. निवडणुकीस ते परीक्षा समजतात! पण त्यांची प्रतिमा या विद्या विभूषितपणाशी निगडीत आहे. इकडील वर्तमानपत्रातून त्यांच्या सदरांचे नियमित लेखन करताना, त्यांच्या विविध विषयावरील अभ्यासपूर्ण पुस्तकांचे लेखन करताना, त्यांचे नुकतेच प्रकाशित आत्मचरित्र लिहिताना त्यांच्याबरोबर मी सदैव होतो. त्यावेळी त्यांच्या अभ्यासू वृत्तीवर मी भाळलो म्हणावयास हरकत नाही. मी लिहिलेली ओळ न ओळ ते आपल्या स्वीय सहायकाकडून तपासून घेतात. गगनरावांना अशी परफेक्शनची आस पहिल्यापासूनच आहे.

त्यामुळे आपल्या मतदारसंघात सगळे काही नीटनेटकेच व्हावे यावर त्यांचा कटाक्ष असतो. उदाहरणच द्यायचे तर मागील निवडणुकीत इकडील निवडणूक अधिकाऱ्यांची जातीने सोय त्यांनी केली होती. दुसरीकडे निवडणूक अधिकाऱ्यांसारखे मोठे अधिकारी पडक्या गेस्ट हाऊसेस मध्ये राहात असताना, अतिथी देवो भव संस्कृती जोपासत त्यांनी सगळयांची सोय जातीने केलेली, पाहुण्यांना इथे कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेतली. सांगण्याचा मुद्दा इतकाच, त्यांना सगळया गोष्टींत सारे काही व्यवस्थित करण्याची सवय आहे. त्यामुळे या मतदारसंघातील छोट्यात छोट्या कामांवरही त्यांच्या नावाचे फलक व्यवस्थित झळकताना दिसत असतील तर नवल नाही! जागोजागी या खडकपुरातील विकास कामे नि त्यावरील त्यांच्या नावाचे बोर्ड्स पाहताना त्यामुळे त्यांचे कर्तृत्व पाहून अभिमान वाटतो. खडकपुरातीतल एकाच नाल्यावर एका वर्षात तीनवेळा त्यांनी स्लॅब टाकून घेतलेला मी स्वतः पाहिला आहे नि पर्यावरणाबद्दल जागरूक असणाऱ्या नि त्यासाठी तळमळ असणाऱ्या गगनरावांनी एकाच ठिकाणी गेली पाच वर्षे नवीन रोपटे लावून पर्यावरण दिन

साजरा केलेला ही पाहिला आहे. दरवर्षी पावसाळ्यात रस्ते वाहून गेल्यावर गगनराव आपल्या निधीतून रस्ते परत बनवून घेतात. गावात पूरस्थिती उद्भवते तेव्हा गावाच्या सोयीसाठी त्यांनी खास बोटी बनवून घेतल्या आहेत. गगनरावांच्या कर्तृत्वाचा वेलू असा गगनावरी जाताना पाहून ऊर भरून आल्यावाचून राहात नाही.

थोडक्यात खडकपूरवासियांना गगनराव अतिकोरे पाटीलांनाच मतदान करण्याचे आवाहन करण्याची फारशी गरज नाही. तरीही ते मी करेनच. व्यक्तिशः त्यांच्या आमदारपदाने माझ्या साहित्य कारकीर्दीचा फायदा आहे म्हणून नव्हे, पुढील वर्षी इकडे होणाऱ्या साहित्य संमेलनासाठी मी उमेदवारी देणार म्हणून नव्हे .. माझे शिक्षण समितीच्या अध्यक्षपदाचे सारे त्यांच्यावर अवलंबून आहे म्हणून नव्हे .. तर खडकपूरच्या सर्वांगीण विकासासाठी. गगनरावांची हार झाल्यास होऊ शकणाऱ्या अनर्थास टाळण्यासाठी गगनरावांनीच निवडून येणे गरजेचे आहे हे मी सांगावे असे नाही. खडकपूरवासी सुज्ञ आहेतच. ते अन्य कोणास निवडून देणार नाहीत हे पक्के.

ताई माई अक्का विचार करा पक्का आणि गगनरावांच्या रबरी शिक्का या निशाणीवरच मारा शिक्का.. या सारखी सरकार काव्य रचना माझ्यासारख्या साहित्यिकाकडून अपेक्षित नाही तेव्हा गगनरावांबद्दक चार ओळी म्हणून मी माझे हे भाषण संपवतो..

आकाशी तो एकच सूर्य अन चंद्रही एकच
खडकपुरीही सम्राट एक अन राजा एकच..
कार्यकुशल अन हृदयसम्राट लाडके
आमदार अतिकोरे पाटील गगनराव नेकच
गगनराव नेकच.. गगनराव नेकच..

पुन्हा भेटूया गगनरावांच्या विजयोत्सवाच्या सभेत..

.. तोवर नमस्कार.

५.

*संमेलने हा साहित्य विश्वाचा अविभाज्य भाग आहे. नि त्याचे अध्यक्षपद हा संमेलनाचा अविभाज्य भाग. मी प्रथितयश झालो की हे सारे ओघाने येईलच. फक्त या लेखकूचा  प्रथितयश लेखकराव होणे बाकी आहे! मग साहित्य संमेलनाध्यक्षाची खुर्ची माझी. आणि बाकीच्या .. तिथपर्यंतच्या स्टेपिंग स्टोन्स!*

१. अ.भा. विश्व विद्रोह संमेलन
२. ग्रामीण साहित्य संमेलन
३. फुटीर संमेलन
४. साहित्य संमेलनध्यक्ष पदावरून!

# अखिल भारतीय विश्व विद्रोह संमेलन

*(आजची समाजव्यवस्था आणि मी प्रस्थापित लेखकराव होईपर्यंत किती बदलली असेल? कदाचित विद्रोह शब्दाची व्याख्याच विद्रोहाशीच विद्रोह करत अगदी उलट झाली असेल? मग त्यात एक शब्दखेळाडू विनोदी लेखकास स्थान मिळणे दुरापास्त नसेल. आज विद्रोह कदाचित शासन व्यवस्थेविरूद्ध होत असेल .. तेव्हा हेच शासन त्या विद्रोहास मॅनेज करण्यात तरबेज होऊन त्याच्याच छत्रछायेत अशी संमेलने घडवण्यास उत्तेजन देत असेल.. क्षोभाचा निचरा कसाही का होईना करवून घेणे.. अशा ठिकाणी मग माझ्या सारख्या लेखकाची गरज भासेलच. अखिल भारतीय विश्व विद्रोह संमेलनाचा मी अध्यक्ष तर नाही, पण प्रथितयश म्हणून स्वागताध्यक्ष होईन. त्यावेळच्या माझ्या कार्यबाहुल्याचा विचार करता तेव्हाचे भाषण आजच तयार करून ठेवलेले बरे!)*

नमस्कार.

आज या विद्रोही संमेलनाच्या स्वागताध्यक्ष पदावरून सर्वांचे स्वागत करताना मला खास आनंद होत आहे. खरेतर संमेलन विद्रोही असताना तिथे आनंदाची एखादी बाब कोणी बोलून दाखवणे हाच मोठा विद्रोह मानावा का? आणि माझ्यासारख्या विनोदी लेखकास विद्रोहासाठी स्वागतास बोलवावे हा विनोद मानावा की विद्रोह हा प्रश्न मी आपल्या जाणकार आणि विचक्षण अशा श्रोतृवृंदावर सोडून आपल्या सर्व उपस्थित आणि अनुपस्थित जनांचे स्वागत करतो.

तुम्ही म्हणाल, उपस्थित नसलेल्यांचे स्वागत कसे काय करता येईल? पण उपस्थितांचे स्वागत हा शिरस्ता असताना तो मोडणे हे विद्रोहाचे पहिले लक्षण आहे हे समजून अनुपस्थितांचे स्वागत करणे उचित होईल असे माझे विद्रोही मत आहे.

आज येथे सारा समुदाय हा गंभीर विचार करणारा गंभीर समुदाय आहे. येथे येण्यासाठी गांभीर्य ही पूर्व अट आहे याची मला कल्पना आहे. तरीही एका विदूषकास येथे बोलावण्यात

येणे हा खास काव्यगत न्याय आहे. हे काव्यगत न्यायातील काव्य म्हणजे व्यंग्य कविता असावी असा माझा अंदाज आहे. व्यंग्यातून विद्रोह साधला जाऊ शकतो असा संदेश बहुधा या संमेलनाच्या व्यवस्थापन समितीस द्यायचा असेल का? कदाचित असेल अथवा नसेलही.

विद्रोही कविता आणि विद्रोही कथा यांनी समाजाशी विद्रोह करावा की साहित्याशीच विद्रोह करावा? की रूढी आणि परंपरांशी करावा? याची उत्तरे या संमेलनात मिळावीतच.

आणि विद्रोह म्हणजे नक्की काय आणि कोणाशी आणि कशाशी द्रोह केल्यास विद्रोह मानला जावा किंवा कशाशी द्रोह न करणे हे विद्रोहास अपेक्षित आहे याचा उहापोह होणे अपेक्षित असले तरी हे विद्रोही संमेलन असल्याकारणाने हे सर्व टाळून अन्य काही बाबतीत येथे विचार विनिमय झाला तरी आश्चर्य वाटावयास नको. प्रसिद्ध विद्रोही कवी जनाभाऊ झोंबरे म्हणतात, सत्यासत्यास मन केले ग्वाही मानियले नाही जनमता या सारखा दुसरा विद्रोह नाही. जनमत न मानता आपले एक मत पुढे रेटणे म्हणजे विद्रोह? किंवा जनमताचा रेटा तयार करणे म्हणजे विद्रोह? प्रस्थापितांविरूद्ध बंड करणे

म्हणजे विद्रोह की द्रोहा विरूद्ध बंड म्हणजे विद्रोह? बंडखोरी म्हणजे विद्रोह असेल तर वेगवेगळ्या निवडणुकांत पक्षाविरोधात जाऊन उभे राहणारे बंडखोर म्हणजे विद्रोही मानावेत का? आणि मग अशांना या विद्रोही संमेलनास सन्मानपूर्वक पाचारण करावे का? किंवा ह्या विद्रोह संमेलनाचा घाट घातला जात असताना ज्या कोणी .. नावे घेण्याची गरज नाही .. त्यास विरोध केला .. किंवा साध्या भाषेत, ज्या कोणी त्यात मोडता घालण्याचा प्रयत्न केला ते विद्रोहविरोधी विद्रोही मानावेत का?

तर मित्रहो, प्रश्न अनेक आहेत. ते पडत आहेत. आणि प्रश्न पडणे, पडत राहणे हे विद्रोहाचे प्रथम लक्षण आहे. थोडक्यात काय तर विनोदी लेखकास कुठलेतरी प्रश्न पडत असतील तरी तो अशा प्रश्नांमुळे विद्रोही समजला जावा का?

हा घ्या अजून एक प्रश्न!

आजपासून दोन दिवस इथे विद्रोहाचा उत्सव होईल. उत्सव साजरे करणे ही प्रस्थापित पद्धती असेल तर तसे सांगणे कदाचित या मंचावरून प्रशस्त दिसणार नाही. तेव्हा येथे विद्रोही मंडळी आपापल्या तलवारी परजतील, शब्दांची अस्त्रे आणि शब्दांची शस्त्रे शमीच्या झाडावरून त्यांनी

कधीच उतरवली आहेत, त्यांचा वापर करून प्रस्थापिताविरूद्ध बंडखोरी करण्यास चालना देतील.. या सर्व व्यवस्था बदलण्याच्या अथक प्रयत्नांती तो समतेचा दिवस उजाडेल तो साजरा करतील तेव्हा तरी त्यास उत्सव म्हणता यावे.

तर उपस्थित अन अनुपस्थित मित्र मंडळी अन बंधु भगिनींनो नमनास इतके पळीभर तेल घालून या अखिल भारतीय विश्व विद्रोह संमेलनात आपले सर्वांचे स्वागत आहे. यापूर्वीची संमेलने कोण्या मोडक्या तोडक्या जागी होत असत. दूरदूरचे जण येऊन आपले विचार मांडत असत. त्या तिथे गांभीर्याचे राज्य असे. आज परिस्थिती बदलली आहे. आधीच्या विद्रोहाच्या कल्पनेशीच विद्रोह करत हे संमेलन या आलिशान ठिकाणी भरवले जात आहे, त्यास शासन दरबारातून जनतेस उत्तरदायी अशा मंत्री महोदयांचा हातभार लागत आहे, विद्रोही जन हे ही आमचेच म्हणत त्यांनी आलिंगनासाठी हात त्यातील धनादेशासह पुढे केला आहे ही विद्रोह संमेलनाच्या दृष्टीने मोठी लक्षणीय बाब आहे. त्यातूनच माझ्यासारख्या विनोदी लेखकास यात सहभागी होता येत आहे, याहून आनंदाची गोष्ट दुसरी कोणती असेल?

इथे या मंचावरून मी सर्वांचे स्वागत परत एकदा करून पुढील संमेलनास शुभेच्छा चार ओळींतून व्यक्त करतो..

फोडून काढू प्रस्थापिताची पाठ
आमच्याशी आहे समजावी गाठ

धन धान्य सत्ता आणि नको मोह
आम्हा घरी सत्य एकच तो विद्रोह..

तत्व व्यवहार यांची घालावी सांगड
सुटेल कदा मग विद्रोहाचे त्रांगडं

सरते शेवटी मंचावर उपस्थित प्रतिष्ठित मंत्रीगण, आमदार, नगरसेवक आणि इतरेजनांचे आभार मानून हे विद्रोह संमेलन सुरू झाल्याचे मी जाहीर करतो..

## ग्रामीण साहित्य संमेलन

*(मायबाप सरकारचे अनंत उपकार आहेत. रस्ता तिथे खड्डा आणि गाव तिथे एस टी उपक्रमाअंतर्गत दूरदूरच्या खेडेगावात ही लाल गाडी पोहोचते. त्यामुळे तशी जाण्यायेण्याची सोय होते. म्हणून मग आमच्यासारखे शहरी लेखक कुठूनही आमंत्रण आले की गावोगावी जाऊ शकतात. त्या पुण्याईच्या जोरावर ग्रामीण साहित्य संमेलनात वर्णी लागली की हे भाषण करण्याची तथापि ठेवायलाच हवी. ग्रामीण म्हटले की थोडा ठसका हवा.. गावरान ठसका हवा की आपला शहरी बाणाच बरा? काही असो, जोवर त्या मुख्य संमेलनाच्या खुर्चीला गवसणी घातली जात नाही तोवर असे छोटे छोटे प्रसंग साजरे करून घ्यायलाच हवेत..)*

रामराम मंडळी.

त्याचं काय आहे, कालधरनं या परसंगाची वाट आम्ही पाहून राह्यलो होतो. म्हंजे कदी या संमेलनात आम्ही येतो आन कदी श्रोतेवर्गाला आमच्या अमोघ वाणीनं मंत्रमुग्ध करून सोडतो..

या टवाळवाडीच्या रणरणीत उन्हात या साहित्य संमेलनाचे लोकानले लई कवतिक. आपली कामं धामं टाकून समदे जन इकडे आसे जमलेले पाहून आम्ही असे भारावून गेलो आहोत की त्या खडबडीत रस्त्यावरल्या लाल गाडीच्या खडखड प्रवासाचा शीण कुठच्या कुठं नाहीसा झाला. काल रातच्याला आम्ही ह्या गावच्या भूमीवर पाऊल टाकले. टवाळवाडी तव्हा आपले नाव तर सार्थ करनार न्हाई ना अशी भीती व्हती. पन न्हाई. आमचा लौकिक विनोदी लेखक म्हनून, पन आमचा विनोद आवडून घ्यायलाबी एक टवाळ न्हाई आढळला. न्हाई म्हणायला आम्ही त्या लाल गाडीतून उतरलो, आमच्या पांढऱ्या शुभ्र कपड्यावर लाल मातीचा थर घ्यून.. तव्हा यस्टीसमोर चार ल्हान पोरं आली व्हती. कुटं जानार साह्येब म्हनत. पन ती ल्हान पोरं. त्याना

टवाळ कसं म्हनावं? पन आम्ही साहित्य संमेलन बोल्लो तर पोरं टवाळपने हासली. बहुतेक हा काय कामाचा न्हाई म्हणून बाजूस झाली.

येताना मनात धाकधूक व्हतीच. आम्हाला वाटले, या संमेलनाला कुनी येतं की न्हाई? पन हा उपस्थित जनसमुदाय पाहून भरून आलं. सारी गर्दी साहित्यदर्दींची आहे. जनांचा प्रवाह आमच्या भाषणास आन साहित्य चर्चेस लोटला हे पाहून आमचे मन भरून आल्याबिगर कसे राहिल?

तर रसिक श्रोतेहो, आज या टवाळवाडीतील ग्रामीण साहित्य संमेलनात एक पाहुणा म्हणून येताना आम्हास खूप आनंद होत आहे. काल रातीला सामिष भोजनाचा आस्वाद घेताना वाटलं ते ह्येच की ग्रामीण साहित्याची ऊर्मी शहरी संस्कृतीहून कितीतरी वेगळी. गॅसच्या चुलीवरची चव लाकूड नि कोळशाच्या चुलीवरल्या रटरट शिजलेल्या मटनास कुटनं येनार? तसे ग्रामीण साहित्य नि लिखाण आपली वेगळी चव घ्यून जन्माला येतं. शहरातील कवीला निसर्ग पहायला दूर जावं लागतं. आकाशाकडे पाहून सूर्य चंद्र ताऱ्यावर कविता करनारा कवी शहरात आकाश दिसणेच दुरापास्त असताना ते उगवती अन

मावळतीचे रंग कसे काय रंगवनार? काळ्या आईवर नि शेतीवर शिमिट कॉंक्रीटचे रस्ते पाहून कसले काय लिहिनार? म्हंजे इतकंच, ग्रामीण साहित्य उपजण्यासाठी माणूस तेथील जमिनीतून आला असाया पाह्यजे. अर्थात कुनी म्हणेल लेखकाने आपल्या कल्पना शक्तिस ताणून लिहावे. पन न घेतलेल्या आन्भवाबद्दल लेखक प्रामाणिकपणे लिहिल की काय?

ग्रामीण साहित्यातून ग्राम्य जीवनाचे रंग दिसाया पाह्यजेत. ग्रामीण माणसाचा सरळपणा नि पाव्हण्यारावण्याचं स्वागत करण्याची आतिथ्यशीलता नि त्याच बरोबर त्या माणसाची अंगभूत हुशारी आन बेरकीपना अन इरसालपना.. साऱ्यांचे प्रतिबिंब साहित्यात पडाया लेखक त्या मातीतूनच वर आला पाह्यजे. तसा शहरी लेखक लिहितो बी, तसा प्रयत्न करतो बी, पन त्यात अस्सलपना हवा, म्हंजे गावरान तुपावानी त्याचा घमघमाट हवा. त्यामुळे आम्हाला ग्रामीण साहित्याचं कवतिक वाटतं. ग्रामीण सुखदुःखे गावरान लेखकच जास्त समर्पक लिहू शकतो. अर्थात आम्ही बी ग्रामीण लिखाणाचा प्रयत्न केलाय. आमची गावच्या राजकारनावरची इनोदी प्रेमकथा 'तीन पायांची.. खुर्ची प्रेमाची' प्रसिद्ध

आहे .. ह्याच मंडपाबाहेर त्याच्या प्रती विक्रीसाठी आहेत.. मुद्दाम सवलतीच्या दरात.. जरूर वाचून बघा. तरीबी अस्सल गावरान ते गावरानच.

ग्रामीण संमेलनाच्या निमित्ताने ग्रामीण साहित्याची दखल घेतली जावी अन मुख्य साहित्य प्रवाहाने ग्रामीण कथा कविता अन सारं काही लिखाण यास सामावून घ्यावं असं आम्हास मनापास्नं वाटतं. त्याचं काय आहे की माणसाला जे न्हाई त्याचं आकर्षण वाटतं. शहरी माणूस गावचं रम्य चित्र मनाशी रेखून गावात येतो नि येथील संथ आयुष्य पाहून कटाळून जातो.. ग्रामीण माणसाला शहराचं आकर्षण फार. पन इथली धावाधावी त्याला कशी पटावी? असं असलं तरी माणूस ल्ह्यायचा काय थांबत न्हाई. पन म्हनून शहरी लेखकाच्या साहित्यात ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब पडतच न्हाई असे न्हाई. तरीबी

ह्या ग्रामीण साहित्याची चव काही वेगळीच अन त्यात गावच्या हवेसारखा ताजेपना आहे.

आपल्या या संमेलनाच्या निमित्ताने कित्येक गावठी लेखकांची.. गावठी म्हंजे गावातील या अर्थाने .. भेटगाठ झाली. दूरदूरचे रसिक जातीने हजर आहेत. ह्या संमेलनाचा घाट घालणारे आयोजक, संयोजक नियोजक त्याबाबतीत

कवतिकास पात्र आहेतच पन सकाळधरनं जे लोक येतील त्यांना रात्री लावनीचा कोर्रेक्रम फुकट अशी योजना राबवणाऱ्या आयोजन समितीचे कवतिक करावे तितके थोडेच..

आता ज्यादा वेळ न घेता पुढील सूत्रे आम्ही पुढील कार्यक्रमाच्या निवेदकांस देतो. परत एकदा या टवाळवाडीतील संमेलनास दिलेल्या आमंत्रणाबद्दल.. कालच्या आमच्यासाठी खास जिवानीशी गेलेल्या बोकडास स्मरून.. अत्यंत आभार..

# फुटीर साहित्य संमेलन

*(कुठलीही सभा म्हटली की तिचे मुख्य वक्तेपद असते. संमेलन म्हटले की अध्यक्षपद असते. आता संमेलन म्हटले की त्यात मतभेद होतात. लोकशाही म्हटले की मतभेद हवेतच. नाहीतर तिला कसली झळाळी येणार? व्यक्ती तितक्या प्रकृती, व्यक्ती तितक्या प्रवृत्ती नि व्यक्ती तितकी मते. त्यातही साहित्य निर्मितीसारखे सर्जनशील कार्य करणाऱ्यांचे संमेलन म्हटले की त्यात साहित्यिकांची मतमतांतरे ठरलेलीच. त्यांच्यात होतात ते मतभेद.. बाकी सामान्यांत होतात ते हेवे दावे .. साधा कुठले समारंभ असेल तर होतात ते रूसवे फुगवे. थोडक्यात काय ही अशी एक हायरार्की अलिखित का होईना आहे.*

*एकदा मुख्य संमेलनाध्यक्षाची निवड झाली.. म्हणजे माझे नाव त्यात नाही इतके निश्चित झाले.. की मी तसा मोकळाच असणार. मग फुटीरांनी संमेलन .. समांतर संमेलन भरवायचे ठरवले की माझ्याहून पात्र दुसरा कोण साहित्यिक त्यांना मिळणार? तेव्हा या समांतर साहित्य संमेलनासाठी*

*जय्यत तयारी करून ठेवावी हे बरे. अध्यक्षपद नाही तर किमान स्वागताध्यक्ष तरी. कारण तसे फुटीर समेंलन असले तरी तिथेही अध्यक्षपदासाठी काँपिटिशन असणारच. तेव्हा स्वागताध्यक्ष म्हणून तयारी करावी. त्यातूनही अध्यक्षपदाची माळ गळ्यात पडलीच तर याच भाषणात थोडे तात्विक मुद्दे घालून ते तसे तयार होईलच. आणि एकदा हे निपटले की मुख्य साहित्य संमेलनाध्यक्ष पदाच्या भाषणाचीही समांतर तयारी करून ठेवायची आहेच. या आधीच विद्रोह संमेलनासाठीची तयारी करून झाली आहेच. काही असो. संमेलन कोणतेही असो. सदैव तयार म्हणजे तयारीत राहणे महत्त्वाचे .. नाही का?)*

प्रिय लेखक मित्र मैत्रिणी आणि बंधु भगिनींनो..

आज या फुटकळनगर खुर्द येथील प्रथम फुटीर साहित्य संमेलनाच्या निमित्ताने सर्वांचे या ठिकाणी स्वागत आणि अभिनंदन. अभिनंदन अशासाठी की मुख्य प्रवाहातील काही साहित्यिक ढुढ्ढाचार्यांनी आपले ताट पंक्तीत आडवे मांडण्याचे ठरवल्यावर त्यावर भरल्या ताटावरून उठून आपण साऱ्यांनी हा समांतर संमेलनाचा घाट घातला आहे. इथे ताट भरलेले सोडाच, पण ताटली ही मिळण्याची शाश्वती नसताना हे अधिकच उल्लेखनीय. पण तरीही खरेतर त्या मोठ्या संमेलनवाल्यांना मुख्य प्रवाह का म्हणावे? निव्वळ शासकीय अनुदानासाठी आणि प्रायोजकांसाठी तेच एक ठिकाण मान्यता प्राप्त आहे म्हणून? खरेतर एखाद्या साहित्यिक संमेलनाची प्रतिष्ठा त्या संमेलनाच्या कार्यक्रमावर अवलंबून असली पाहिजे हे खरे. पण भपका आणि खर्च या असाहित्यिक बाबींवर मूल्यमापन अवलंबून असल्यास हे असेच व्हावयाचे. असो.

तर आपले फुटीर संमेलन घडत असताना याचवेळी तिकडे घडत असणाऱ्या त्या साहित्य संमेलनाची याहून जास्त दखल घेण्याची गरज नाही. आपण सारेच सर्जनशील आणि सृजनाचा आविष्कार करून त्याचा दृष्टांत जनसामान्यांना देणारे लेखक कवी मंडळी आहोत. आपल्या या अंगभूत कलागुणांचा आविष्कार करून जनतेस साहित्याची थोडी का होईना गोडी लावणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. शहाणे करोनि सोडावे सकळ जन म्हटले जाते. तर ते आपले नीयत कर्तव्य आहेच. पण या ठिकाणी एक महत्त्व पूर्ण बाब .. जी आपल्याला ज्ञात असूनही आपण भीडेखातर बोलत नाही .. ती अशी की इतरेजनांस शहाणे करण्याची जबाबदारी असणारा आपला लेखक वृंद स्वतः त्यांच्याहून शहाणाच असला पाहिले. तसा तो गणला जाईलच. फक्त अति उत्साहाने स्वतःस अति शहाणे म्हणवून घेऊ नये इतकेच! या फुटीर संमेलनात दोन दिवस कार्यक्रमांची रेलचेल असेल. संवाद परिसंवाद चर्चा प्रतिचर्चा भाषणे नि कविता कथा वाचन इत्यादी सगळे असेलच. सर्व साहित्य जगताचे त्या मुख्य संमेलनाकडे लागले असताना इकडे आपण

साहित्योत्सव घडवून आणून हे संमेलन यशस्वी करू.

साहित्य संमेलनाचा अध्यक्ष सामान्यतः नवीन काही विचार देतो. श्रोतृवृंदास ऐकण्यास नि विचार करण्यास भाग पाडतो.. इये मराठीचिये नगरीत भाषेचा चिरेबंदी वाडा बांधण्यासाठी एखाद्या गवंड्याप्रमाणे तो विचारांच्या विटा रचतो.

मायमराठीचे पांग फेडण्यासाठी तो झटावे कसे याचे मार्गदर्शन करतो. तो विविध कार्यक्रमात आपले विचार परिलुप्त असे विचार मांडत आपली संमेलनाध्यक्षपदी झालेली निवड कशी यथार्थ आहे हे स्वतःसकट इतरांना पटवून देण्याचा प्रयत्न करतो. हे झाले महाजन ज्या मळलेल्या वाटेवरून जातात त्या वाटेवरील संमेलनाध्यक्षाबद्दल. आपले फुटीर संमेलन सर्वार्थाने वेगळे आहे, असायला हवे. त्यामुळे काही नवविचारांचे नवनीत आपले नव निर्वाचित अध्यक्ष श्रोतृवृंदाच्या हाती देतीलच. विविध विचारांचे पद्धतींचे कडबोळे न करता विशिष्ट विचार देणे हे एक ध्येय असावयास हरकत नाही. अर्थात हा विषय त्यांचा आहे. पण तशी अपेक्षा करावयास हरकत नसावी. आणि तो विचार बहुजन

संमेलनाहून वेगळा असला तरच ह्या फुटीरतेचे चीज होईल.

फुटून निघणे या मराठी भूमीत काही नवीन बाब नाही. मुळे फुटणे नि पालवी फुटणे यात नवनिर्मिती आहे. कित्येकदा फुटाफुटीत नवे काही चांगले निपजत असते. त्यातील हे फुटीर संमेलन एक उदाहरण म्हटले पाहिजे. राजकीय पक्षात निवडणुकीचा सुगीचा हंगाम आला की तिकिट न मिळालेले फुटून निघतात. आपले नवीन बस्तान सोयीनुसार बसवतात. आपणा सर्व मान्यवर लेखकांचे साहित्यिक बस्तान बसवून झालेले आहेच. आता फक्त समाजमान्यता नि राजमान्यता यांच्या साठी हा सगळा अट्टाहास आहे.. हे म्हणणे आमचे नव्हे. तर आपल्या साहित्यिक विरोधकांचे आहे. राजकारणातून ही विरोधक संकल्पना साहित्यकारणात कधी आली सांगणे कठीण असले तरी एकदा राजकारण म्हटले की त्यापाठोपाठ सारेच आले. अगदी मुख्य प्रवाहात लोकशाही प्रक्रिया या नावाखाली निवडणूक चुकत नाही, निवडणूक म्हटले की प्रचार नि त्या अनुषंगाने सारे डावपेच चुकत नाहीत.. तर ह्या विरोधक नामक एका संकल्पनेने तरी काय घोडे मारलेय नाही का? थोडक्यात हे फुटीर संमेलन

म्हणजे साहित्यांतर्गत लोकशाहीचा परिपाक आहे. आणि त्या विरोधकांना एकदा विरोधक म्हणून मान्यता दिली की मुख्य प्रवाहास विरोध करणारे आपण फुटीर यांना ही मान्यता द्यावीच लागेल. असो.

याहून जास्त स्वागतासाठी बोलणे अनुचित ठरेल. फक्त आपल्या फुटीरत्वाची तात्विक बैठक लक्षात घेऊन हे संमेलन यशस्वी करणे हेच आपले ध्येय असावे. या उद्देशाने हे फुटीर संमेलन फुटकळवाडीत संपन्न होत असताना सर्व उपस्थितांचे स्वागत करून हे संमेलन सुरू झाल्याचे जाहीर करतो..

## साहित्य संमेलनाध्यक्ष पदावरून ..

*(शेवटी गंगेत घोडे न्हालेच. खुर्ची कोणाला खुणावत नाही? तशी प्रत्येक साहित्यिकाचे स्वप्न म्हणजे साहित्य संमेलनाध्यक्षाची खुर्ची. ते स्वप्न साकार झालेच. अर्थात आमदार गगनरावांसारखा भक्कम पाठीराखा असताना हे तर होणारच होते.. साहित्यिक कारकीर्दीचा कळसाध्याय लिहिला गेला.. मग ओघाने भाषण आलेच.. एक साहित्य धुरीण म्हणून विचारांचे देणे आले..*
*- आले.. म्हणजे येईल. स्वप्नात रंगलेला मी नि हे तयार ठेवलेले अध्यक्षीय भाषण..)*

सर्वप्रथम मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांना नमस्कार. आज इथे साहित्य व्यवहाराच्या इतिहासातील हा सुवर्णदिन साजरा करण्यासाठी आपण सारे जमले आहोत.. त्यात माझ्यासारखे प्रथितयश किंवा अन्य होतकरू लेखक आहेत, कवी आहेत, नाटककार नि समीक्षक सारेच आहेत.. त्याचबरोबर या साहित्य उरूसास सर्वसामान्य रसिकही मोठया संख्येने गर्दी करून आहेत. त्या सर्व जमलेल्या साहित्य रसिकांना अभिवादन करून या अध्यक्षीय भाषणाची सुरूवात करीत आहे. त्याआधी, आयोजकांनी इतर उपस्थित पुढाऱ्यांच्या आधी अध्यक्षीय भाषणास पुरेसा वेळ उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचेही आभार मानावे लागतील. आणि त्याचबरोबरीने हिंदी चित्रपटसृष्टीचे आपले सर्वांचे लाडके हीरो अभिजातकुमार आज आपल्याबरोबर आहेत. आपण सगळेच त्यांच्या एका दृष्टीक्षेपासाठी आतुर असतो ते याचि देही याचि डोळा येथे पहावयास मिळत आहेत.. त्यांना नमस्कार करून मी साहित्यविषयक नवविचार घेऊन आपल्या अध्यक्षीय भाषणाची सुरूवात करतो.

ह्या अध्यक्षीय खुर्चीस एक परंपरा आहे. आज मी कित्येक अडथळे पार करून इथवर पोहोचलो आहे. गेल्याच वर्षी याच खुर्चीवरून दंगल उसळलेली आपण पाहिली आहे. या दंगलीतून दोन गोष्टींचा बोध घेता आला. एकतर या खुर्चीचे महत्त्व आणि दुसरे.. कित्येकांचा आक्षेप असतो की साहित्य व्यवहार हा प्रत्यक्ष आयुष्याशी फटकून चालतो.. त्याचा अत्यंत प्रभावी प्रतिवाद या दंगलीमुळे झाला. प्रत्यक्ष समाज जीवनात अशा दंगली मधून मधून उसळत असतात, उसळवल्या जात असतात. आपल्या मंचावरचे कित्येक दंगली आयोजित करण्याचा अनुभव असलेले प्रतिष्ठित नेते नामदार श्री.गगनराव अतिकोरे पाटील याबद्दलचे त्यांचे अनुभव सांगतीलच. पण मुद्दा महत्त्वाचा असल्यावाचून अशा दंगली होत नाहीत. यावरून या खुर्चीचे महत्त्व ही पुन्हा सिद्ध झाले.

आज या मंचावर उभे राहताना मी खूप दिवसांनी सहज श्वास घेत आहे. गेले काही महिने अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत गेले. त्याचा थकवा अजूनही जाणवत आहे. पूर्ण महाराष्ट्र पिंजून काढणे आणि त्याहूनही जास्त

थकवा आणतील असे डावपेच लढवणे या वयात थकवा न आणतील तरच नवल. कमीतकमी पंच्याहत्तर वर्षे उलटल्यावाचून आपल्याकडे ही निवडणूक लढवता येत नाही. आमच्या थरथरत्या हातांनी निवडणुकीच्या उमेदवारी अर्जावर सही करतानाच या धामधुमीची कल्पना आम्हाला आली होती. माझे प्रतिस्पर्धी उमेदवार त्यांच्या समर्थकांसोबत ढोलताशे घेऊन तो भरायला आले होते ते पाहून अंदाज आलाच होता. आता इतके सारे करून ते पडले निवडणुकीत हा भाग वेगळा. आज ते येथे उपस्थित नाहीत. त्याचबरोबर अन्य पडलेले उमेदवार ही येथे नाहीत. त्यातील कुणी न्यायालयात या निवडणूक निकालास स्थगिती मिळवण्यासाठी कोर्टाची पायरी चढणार ही अफवा उठलेली.. ती अफवा न राहता सत्यात उतरली. ती देखील लढाई जिंकून आज अध्यक्षीय भाषणाची जबाबदारी पेलत आहे. तसे पाहिले तर साहित्यिकास त्यात कठीण ते काय? उचलले पेन लावले कागदाला नि उतरवले मनातील विचार इतके सोपे आहे ते. पण आधी राजकीय नि नंतर न्यायालयीन डावपेच व युक्तिवाद यांत ऊर्जा खर्ची पडल्यावर हे भाषण उर्वरित ऊर्जेवर अवलंबून मी करत आहे.

अध्यक्षीय भाषण हा एक साहित्य विचार असतो. गेल्या कित्येक वर्षात ही परंपरा पडलेली आहे. त्या भाषणामुळे कित्येक वृत्तपत्रीय संपादक दोन तीन दिवस संपादकीय पानासाठी तयार मजकूर मिळणार म्हणून निश्चिंत असतात. त्यावर साधक बाधक चर्चा होते. विचार मंथन होते. त्या घुसळणीतून एक साहित्य नवनीताचा गोळा हाती लागतो. आता काही धूर्त बोके तो हलकेच हस्तगत करून गट्टम करतात हा भाग वेगळा. पण महत्त्वाचा मुद्दा हा की हे भाषण हा एक नवविचार देण्याचे व्यासपीठ आहे.. तो देण्यासाठी इंग्रजीत टूथ अँड नेल म्हणतात अशी फाईट देऊन मी उभा आहे. आपल्या महाराष्ट्र देशाला विचारांचे वेड आहे. मागील काही संमेलनांतील अध्यक्षीय भाषणांतून नवे काय हाती लागले असा प्रश्न काही इथवर पोहोचण्याची स्वप्ने देखील न पाहू शकणाऱ्या टीकाकार पेपरवाल्यांनी विचारल्याचे मला आठवते. आम्हाला टीकेचे वावडे नाही. पण अस्थानी, अवाजवी व न पटणारी टीका? त्याबद्दल दुमत होऊ नये. टीका जरूर करावी. पुढे जाण्यासाठी ते आवश्यक आहे. पण आजच्या भाषणावर? आजवर झाले ते झाले. ते असो. पण

तसे माझ्या या भाषणाबद्दल होणार नाही.. अथवा माझे समर्थक तसे होऊ देणार नाहीत. नामदार गगनराव अतिकोरे पाटील आणि त्यांचे खंदे लढवय्ये समर्थक या संमेलनाच्या पाठीशी आहेत इतकी नोंद घेतली जावी. बाकी सारे सुज्ञ आहेतच.

नव विचार म्हणजे काय? काही वर्षांपूर्वी मी अस्मानापुराच्या गुळमुळीत साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवले. त्यावेळी आमचे लाडके नामदार सांस्कृतिक खात्याचे राज्यमंत्री होते. तेव्हा त्यांच्या वरदहस्तानंतर सव्वा सतरा लाखांचा निधी मिळून हे गुळमुळीत संमेलन आयोजण्यात आले होते. त्यानंतर पुढील वर्षी मी पाताळगंगा द्रोही विद्रोही संमेलनाच्या अध्यक्षपदावरून शासन मदतीचा व अनुदानाचा निषेध भर व्यासपीठावरून केला होता. आज या मुख्य प्रवाहातील संमेलनास नामदारांच्या कृपेने परत शासकीय आर्थिक मदतीचा हात मिळाला आहे. तेव्हा शासन म्हणजे जनता.. शासनाचा पैसा हा जनतेचाच पैसा.. त्यामुळे त्याचा अव्हेर न करता त्यातून दिमाखदार साहित्य संमेलन आयोजित करून आपल्या भाषेची सेवा करण्यात कोणतीही गैर बाब नाही हे मी ठासून सांगू

इच्छितो. त्याबदल्यात काही शासन व्यवहारांकडे कानाडोळा करणे उचित ठरावे हा विचार मी देऊ इच्छित आहे. मागे मराठी शाळा बंद करण्याबद्दल मोठा गहजब झाला. पण तो किती अस्थानी होता हे आपल्या लक्षात आले नंतर. शासन हे भाषा विरोधी नाही. फक्त ज्या भूखंडावर त्या शाळा उभ्या आहेत त्यांची किंमत जाणून त्या बंद करण्याचा निर्णय जर जाणकार सरकारने घेत असेल तर त्यास भाषा द्वेष कसे म्हणता येईल? सर्व अंगांनी या व अशा निर्णयांचा विचार होणे आवश्यक असते. या सर्वात माझा विचार हाच आहे.. आपण ज्या मंचावर उभे आहोत.. ज्यांच्या कृपेने उभे आहोत.. त्या वेळी त्यास अनुसरून तशी भूमिका घेणे आवश्यक आहे. कृतज्ञता हा सद्गुण होता आणि आहे ही. पण हा मिंधेपणा आहे असा विचार देखील करणे म्हणजे कृतघ्नता आहे असे मला मनापासून वाटते. असो.

साहित्य व्यवहार म्हणजे काय? साहित्यिकाच्या प्रतिभेतून साकार एखादी कलाकृती कशी होते? आपल्या प्रतिभेचा दृष्य आविष्कार म्हणून आपली साहित्य कृती सादर करताना लेखकाच्या मनातल्या उचंबळून येणाऱ्या

भावना कशा असतात .. किंवा त्याआधी आपल्या लेखनाचे आयोजन वा नियोजन कसे करावे, लेखकाने आपला जीवनानुभव कसा वाढवावा, एखादी कल्पना कशी फुलवावी, कवीने आपल्या कल्पनांवर कवितेचा साज कसा चढवावा किंवा एखाद्या समीक्षकाने दुर्बोध भाषेसाठी साधना कशी करावी इत्यादी साहित्य विषयक चर्चेचे हे ठिकाण नाही. साहित्य संमेलनातून या विषयांवर चर्चा होणे अपेक्षित असणे हा जुना विचार झाला. नव विचार हा अधिक जीवनाभिमुख आहे. प्रत्यक्ष जीवनात जे अनुभवास येते.. आपल्या मायबाप सरकारचे जे लोकाभिमुख काम चालते त्याच्या्या प्रत्यक्ष पावती देण्याची ही संधी आहे. नि ज्यांच्या कृपेने पंचतारांकित वातावरणात व पंचतारांकित हाॅटेलात संमेलने होऊ शकत आहेत त्यांच्याबद्दल कृतज्ञतेचा नव विचार देणे हे अध्यक्ष म्हणून माझे कर्तव्य आहे असे मी समजतो. काही वर्षांपूर्वी उघड्या मैदानात धुळीच्या साम्राज्यात होणारी संमेलने आज या वातानुकूलित वातावरणात आणून मराठी भाषेची दृष्य प्रगती झालेली दिसत आहे त्याबद्दल शासन दरबाराचे आभार मानणे हे माझे अध्यक्ष म्हणून आद्य कर्तव्य

आहे असे ही मी समजतो. माझे विरोधक याबद्दल काही बरळतील. स्वतःस स्वाभिमानी म्हणवून घेण्याबद्दल ख्याती असलेले काही लेखक त्यात हो ला हो मिळवतील. पण माझ्या उपस्थित वाचकांनो .. आपल्या लाडक्या अभिजातकुमारांच्या साक्षीने मी आवाहन करतो.. अशांकडे दुर्लक्ष .. अनुल्लेख हाच प्रगतीकडे जाण्याचा एकमेव मार्ग आहे. नपेक्षा आम्ही या पंचतारांकित हा ॅटेलच्या एका रूम मध्ये वास्तव्याचे नि तुम्ही अशा हाॅटेलात भोजनाचे स्वप्न साकार करू शकला असता काय? ही मक्तेदारी फक्त आंग्ल पाश्चात्त्य भाषेचीच का असावी? माझी मराठी कवतुके या दिमाखदार श्रीमंती वातावरणात का नसावी? विचार करण्यासारखी गोष्ट आहे. टीकाकारांस ही प्रगती बघवणार नाही. त्यांना आपल्या भाषेस तसेच उघड्या मैदानात पिठले भाकरी नि मसाले भात खात उघड्यावर टाकायचे असेल नि त्यातच भाषेची सेवा म्हणून काही गंभीर परिसंवादांतून काही वांझोट्या निष्कर्षाप्रत यायचे असेल तर असा साहित्य विचार त्यांनाच लखलाभ होवो. आम्ही सर्व नामदार व त्यांच्या शासनामागे उभे होतो.. आहोत.. आणि पुढे ही राहू.

हा नव विचार मानावा का? गेले काही वर्षे राजसत्ता नि त्यास फटकून राहणारी ही साहित्यिक मंडळी यांत छुपे शीतयुद्ध चालू आहे की काय असा संशय येत असे. अर्थात अशा स्वतःस शहाणे समजणाऱ्यांची संख्या बोटांवर मोजण्याइतकी असेल तर इंग्रजीत ज्यास न्यूसन्स व्हॅल्यू म्हणतात त्या अनुसार त्यांची ताकद फुगलेल्या बेडकीप्रमाणे ते अधूनमधून दाखवीत असतात. त्यांना न जुमानता कित्येक संमेलने झालीत. यशस्वी झालीत. अजूनही या मंडळींस पावसाळ्यात बेडकांना फुटावा तसा कंठ फुटतो. साहित्यिक सार्वभौमत्वाच्या चुकीच्या व कालबाह्य समजुतींत ते अडकून अरण्यरूदन करीत असतात. अशात जनतेच्या प्रातिनिधीक सरकाराचे महत्त्व व लोकशाहीचे महत्व ओळखून मी नि:संदेह हे सांगू इच्छितो की ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी हा पूर्णपणे नवविचार जरी नसला तरी सर्व जनांनी मनात रूजवावा असा विचार आहे. आजवर तो कित्येक जण पाळत आले असतील. कित्येक त्याबद्दल ऐकून असतील. पण या संधीचा फायदा घेत याच

व्यासपीठावरून मी हाच विचार हलवून खुंटी बळकट करावी तसा बळकट करीत आहे.

आजवरची परंपरा मोडत संमेलन अध्यक्षास आपले विचार मांडण्याचा पुरेसा अवधी दिल्याबद्दल मी आयोजकांचे मनापासून आभार मानून माझ्या भाषणाचा समारोप करतो.

जय मराठी! जय महाराष्ट्र! गगनराव अतिकोरे पाटलांचा विजय असो!

६.

## कृतार्थ मी!

*याच साठी केला होता अट्टाहास*
*म्हणत पेन्शनर गावात बंगला बांधतो*
*किंवा शहरात स्वतःचा फ्लॅट घेतो..*
*तसा लेखक.. म्हणजे मी.. साठी*
*गाठली की साठीसाठी सत्कार*
*ठरलेला.. नि मुंडी हलायला लागली*
*की जीवन गौरव पुरस्कार ..*
*भाषणे तयार आहेत!*

१.आमचा साठी समारंभ
२.जीवनगौरव पुरस्कार

## आमच्या 'साठी' समारंभाचे भाषण

*(अजून यौवनात असलेला मी, साडेसातशे चंद्रदर्शन होतील तेव्हा माझा जंगी सत्कार होईलच. 'पातोळेसाठी..' असा काही माझ्या साहित्याचा संकलित संग्रह प्रसिद्ध होईल. मोठा समारंभ, त्यात साठ केक, साठ सवाशिणी वगैरे वगैरे. यातील केक आपल्या संस्कृतीत आधीपासून नसेल, पण आता आहे. अर्थात मोरोपंतांची केकावली नि साठ केकांची रांग यांचा अर्थाअर्थी संबंध अर्थातच नाही. आणि सवाशिण? पती जिवंत असल्याचे सॉलिड क्वालिफिकेशन मिरवणारी सवाशिण मात्र आपल्या संस्कृतीचा मानबिंदू. तेथे विधवा वा निपुत्रिकांस स्थान न देणारी आपली वर्षानुवर्षे काल कसोटीवर टिकून राहिलेली व्यवस्था.. ते एक विषयांतर होईल.. तर मुद्दा हा की केव्हा न केव्हा माझी साठी येईल, बुद्धी माझी आताच नाठी झाल्याचे मत अर्थातच माझ्या सौ चे. ते बदलण्याची शक्यता नाही, पण बुद्धीच्या नाठीत्वावर अवलंबून साठी साजरी होत नाही. तेव्हा साठाव्या वाढदिवशीच हे सारे होणे आले.*

*सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती जेष्ठ लेखक पां.तु.पातोळे काय म्हणणार? आजच म्हणून ठेवतो!)*

नमस्कार रसिक वाचक हो!

व्यक्तीच्या आयुष्यात साठीचा पल्ला गाठण्यासाठी एकच गोष्ट लागते. ती म्हणजे तितकी वर्षे जिवंत राहणे! थोडे क्रूड वाटेल पण हे एकच सत्य आहे. पडताळून पहा.. साठीच्या आत परलोकी गेलेल्या कुणाची साठी कधी साजरी झाली आहे? तर हा एक बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर या सारखा मामला झाला. साठीच्या सत्कारात असे बोलायला मेली जीभ धजावतेच कशी तुमची .. ही आम्हाला मिळणारी घरची दाद या वक्तव्यावर! आम्हाला अशी दाद कितीदा मिळाली असेल याची मोजदाद करणेही कठीण. पण तो विषय वेगळा आहे.

विषय निघाला की अघळपघळ इकडतिकडच्या गोष्टी त्यात मनात येत राहतात. सवयच ती आमची. कोणाकोणाला जमेल तसे चिमटे काढत नि वाटेल तशा टपल्या मारत आम्ही पुढे जातो. त्यातील काही स्व टपल्या असल्या की पाय कसे जमिनीवर राहतात. अर्थात जमिनीवर पाय राहू नयेत.. डोक्यात हवा जाऊन तरंगावे असले आजवर काही घडले नाही. दहा बारा

पुस्तके .. त्यातील एका बेस्ट सेलरच्या दोनशेएक खपलेल्या का ॅपीस, घरात माळा अडकवून बसलेले पुस्तकांचे गठ्ठे या जोरावर डोक्यात हवा जाऊ म्हटले तरी जाईल कशी. आणि पुढील वीस वर्षात .. सहस्त्र चंद्रदर्शनापर्यंत ही काही घडेलसे नाही.

सहस्त्र चंद्रावरून आठवले. मागे कुठेतरी वाचलेली कविता.. नक्की शब्द आठवत नाहीत. पण कवी म्हणतो सूर्याला, पुन्हा भेटू उद्या सकाळी. सूर्य म्हणतो, खात्री आहे ना तुझी? तर सहस्त्रचंद्रास अजून अडीचशे चंद्र बाकी आहेत. तेव्हाचे कोणी पाहिले? तसेही या साठीचे कोणी पाहिले होते? पण तरी साठीसमारंभास तुम्ही सर्व आलात.. सर्वांचा मी मनापासून आभारी आहे. चिं.वी.जोश्यांचा निर्धनाचा साठी समारंभ आपण सर्वांनी वाचला असेलच. त्यापेक्षा आमची अवस्था बरी आहे. आमच्या साठी साठी तुम्ही सारे उपस्थित आहात.. आनंद आहे! आणि तसे आम्ही निष्कांचन असलो, सधन नसलो, तरी कचेरीतील कारकूनीच्या कृपेने निर्धनही नाही! कोठून तरी लेखणीवरच उदरनिर्वाह .. आणि काय!

साठीच्या निमित्ताने आम्ही आमच्या साहित्यिक कारकीर्दीचा आढावा घेऊ इच्छित होतो. आमच्या लिखाणाच्या प्रेरणांबद्दल आम्ही विस्तृतपणे इतरत्र लिहिले आहेच. त्यामुळे त्याची पुनरूक्ती करावी असे नाही. आमचे इतर साहित्य ढुंढाळल्यास लेखनाच्या ऊर्मींबद्दल विवेचन सापडेल. तेव्हा हा सत्कार एका लेखकाच्या साठीबद्दल असला तरीही आम्ही आमच्या लिखाणाच्या प्रक्रियेबद्दल फारसे काही बोलणार नाही. आम्ही साहित्याच्या विविध क्षेत्रात मुशाफिरी केली. करत आहोत, नि करत राहू. या आनंदयात्रेत कुणाला सहभागी करता आले तर त्याचा आनंद आहे. कथा, कादंबऱ्या, कविता, नाटके नि इतर लेखनाने आम्ही मराठी साहित्य समृद्ध केले असे कोणी या निमित्ताने म्हणेल. समीक्षा सोडली तर आम्ही इतर सारे काही प्रकार हाताळले. कदाचित आम्हाला दुर्बोध काही लिहिता आले असते तर आम्ही समीक्षाही लिहिली असती. तशी आम्ही कित्येकांची आत्मचरित्रे लिहिली. कित्येक राजकीय भाषणे लिहिली. कित्येकांच्या ज्वलज्जहाल नि मर्मभेदक भाषणांची भाषा आमची होती, ज्यासाठी हे नेतेगण टाळ्या घेऊन गेले. अजून एक आमच्या

साहित्यिक कारकीर्दीचे वैशिष्ट्य आम्हीच सांगत आहोत. ते म्हणजे आमच्या कोणत्याही लिखाणावर आजवर टीकाकारांनी कधीच प्रतिकूल अभिप्राय दिला नाही. त्यावर आमचे साहित्य कुणी वाचलेच नसेल तर अनुकूल किंवा प्रतिकूल कोणी प्रतिसाद देईल.. अनुल्लेखाने दिलेल्या प्रतिक्रिया आहेत या, असे कुणी कुत्सितपणे म्हणेलही. पण आज या साठीच्या समारंभात याकडे आम्हीच अनुल्लेखाने दुर्लक्ष करीत आहोत!

साठीच्या समारंभाच्या निमित्ताने आपण सर्वांनी हा घाट घालून आम्हाला उपकृत करून ठेवले आहे. या निमित्ताने आम्ही मिळणारी थैली कुठल्याशा साहित्यिक उपक्रमास देणगी देत आहोत. त्या थैलीत या उपक्रमांची कागदपत्रे जपून ठेवता येतील. थैलीतील नाशवंत पैशांचा विनियोग कसा करावा याबद्दल मात्र आम्ही अजून काही ठरवले नाही. साहित्य व्यवहारात असले एकगठ्ठा रूपये आम्ही आजवर पाहिले नसल्याने प्रथम आम्ही ते डोळाभरून पाहू. मिळणाऱ्या शालीचा विनियोग थंडीत होईलच, आणिक श्रीफळाचे सार्थक मत्स्यावताराच्या झणझणीत

कालवणात होईल. अशी स्पष्ट दृष्टी आम्ही बाळगून आहोत. या समारंभात पातोळेसाठी.. ह्या ग्रंथाचे प्रकाशन होत आहेच. आमच्या अखंड साहित्य साधनेतून निवडक मौक्तिकांची निवड करण्याचे कठीण काम संपादक मंडळाने लीलया पेलले आहे यात दुमत नसावे. असे सारे स्वतःच बोलणे तसे शोभादायक नाही, परंतु आमच्या या सत्कार समारंभात इतर कोणी हे बोललेच नाही तर? तेव्हा शाळेतील नाटकात काम करताना आम्ही स्वतः सकट इतर पात्रांचीही वाक्ये म्हणत असू ही सहाव्या वर्षीची आठवण साठाव्या वर्षी निघावी.. शेवटी वार्धक्य हे दुसरे बालपण म्हणतात ते खरेच असावे, अर्थात तसे साठ म्हणजे फार वय झाले असे म्हणता येत नसले तरी.

आम्हाला वाटते की आम्ही आमच्या सत्कार समारंभातील हे भाषण थोडक्यात आवरते घ्यावे. आमच्या शतायुषी पिताजींचे स्मरण करीत..

थोडक्यात.. म्हणजे आमचे पितामह म्हणत तसे, थोडक्यात गोडी. जास्त पाल्हाळ लावणे एखाद्या कीर्तनकारास शोभते.. तेव्हा मुद्द्यावर ये.. ते सांगत असत..

तर आजचा मुद्दा.. आजवर जितकी मजल गाठली त्या बद्दल आभार व्यक्त करण्याचा. साठी गाठणारे कित्येक असतात, पण आमच्यासारख्या लेखकाचा हा साठी गाठण्याचा समारंभ घडवून आणणाऱ्या सर्वांचे आभार मानतो.  आणि अर्थातच हा दिवस याचि देही याचि डोळा दाखवल्याबद्दल त्या जगन्नियंत्याचे आभार.. आता आमचे तारू पैलतीरावर लागायचे तेव्हा लागो.. शेवटचा दिस गोड व्हावा.. याहून लई मागणे नाही..

## जीवनगौरव पुरस्कार

*(साहित्य सेवेत खूप वर्षे गेली तरी मोठ मोठी सोडा साधी गल्लीतील बक्षिसे दाखवण्यापुरता मिळणार नाहीत. वर्षानुवर्षे लिहित्या हातास मग एकमेव आधार.. गेलाबाजार जीवनगौरव पुरस्काराचा. तो कदाचित कधीतरी मिळेल. मी तो घेताना भाषणाचा प्रयत्न करीनच. तो दिवस कधी उगवेल? उगवेल तेव्हा उगवेल.. मी आपले भाषण तयार ठेवतोय..! )*

नमस्कार रसिक चाहत्यांनो,

फार पूर्वी एक मोठा नट होऊन गेला. एकदा तो म्हणाल्याचे आठवते.. मला आयुष्यात कुठलेच बक्षीस नाही. न फिल्मफेअर न आणखी कुठले.. आता वय पाहून जीवनगौरव तरी मिळेल याची आशा बाळगून आहे!

नट मोठा पण बक्षिसाचे गणित काही जमले नाही किंवा सुटले नाही. जीवनगौरवासाठी पुरेसे जीवन संपणे गरजेचे, त्यामुळे वाट पाहात बसला बिचारा. मुंडी हलू लागली, पाय लटपटू लागले, कदाचित व्हील चेअरवरून जा ये व्हायला लागली.. की लोकांना भीती वाटते. अगदीच लागले नेत्र पैलतीरी की काय! मग तो जीवनगौरव पुरस्कार बाहेर येतो. बाबा, वर जाशील तर दोन चार चांगल्या गोष्टी सांगशील ना इकडच्या म्हणत. थोडक्यात जिसका कोई नहीं उसका तो खुदा है यारों म्हणतात तसा जिसको और कोई बक्षीस नहीं उसका तो जीवन गौरव है यारों म्हणावे का?

तर, मी हा पुरस्कार घेऊनू धन्य झालो असे म्हणायला हवे.

आजवर बख्खळ साहित्य सेवा केली. कथा झाल्या, दीर्घकथा झाल्या, दीर्घाहून दीर्घकथा म्हणून कादंबऱ्या झाल्या.. नाटके करून नव्हे, लिहून झाली.. चरित्रे झाली.. घोस्ट रायटर म्हणून आत्मचरित्रे झाली. कवितासंग्रह आले. अगदी समीक्षाही लिहून झाली. छापून आले सारे. आजही घराच्या गोदामासारख्या खोलीत पुस्तकांचे गठ्ठे दिमाखात उभे आहेत. बायको धूळ खात पडलीत अशी भर घालते. पण तो पत्नीधर्म झाला. आणि धुळीचे काय? हवा जशी सगळीकडे तशी धूळही सगळीकडे असतेच! तर ते असो. आम्ही शारदेची, मराठी भाषेची निष्काम सेवा हयातभर केली. निष्काम सेवा म्हटल्यावर ना पुस्तकांच्या खपाचा आकडा महत्त्वाचा ना पुरस्कारांच्या राशी.. ते पुरस्कार न मिळालेले नटवर श्रेष्ठ होते.. त्यांचा आदर्श मानून चाललो. बाकी काही नाही तरी त्यामुळे हा जीवनगौरव पुरस्कार मिळतो आहे. आजवरच्या साहित्य सेवेची पावती म्हणून हा पुरस्कार घेताना मला त्यामुळे भरून येत आहे. एकतर आम्ही  विनोदी लेखक, आम्हाला कोणी गांभीर्याने घेत नाही ..माफ करा हे जरा इंग्रजी वळणाचे मराठी वाक्य आहे.. नो वन टेक्स अस सिरियसली .. पण तरीही

हे सत्य आहे! आयुष्यभर लेखनकामाठी केली. शाईच्या कित्येक बाटल्या संपवल्या. कागदाची रीमे संपवली. पेनाची कित्येक निबे तुटली. दिनरात जागून गोष्टी लिहिल्या. पोस्टाने लिखाण पाठवताना पाकिटे नि स्टँप्स चिकटवताना कित्येकदा जीभ टाळूस चिकटली. साभार परतीच्या कथा कवितांची नोंद ठेवली असती तर गिनिज बुकात नावही कदाचित आले असते. जागता झोपता उठता बसता कथेचा विचार. त्या तंद्रीत कित्येकदा आम्ही बावळटासारखे ध्यान दिसलो असू. दिसले असू नव्हे .. दिसलोच. सहधर्मचारिणीने पत्नीधर्मास जागून आमच्या वारंवार निदर्शनास आणलेही ते. तर थोडक्यात करि घेतले व्रत हे अशा प्रकारे लिहित आलो. विनोदी लिखाण ही गंभीरपणे करायची गोष्ट आहे असे आम्ही कित्येक वर्षापूर्वी एका नवोदित होतकरूंच्या कार्यशाळेत म्हणालो होतो, त्याप्रमाणे गांभीर्याने आम्ही लिखाण करत आलो. दु:खी नि रडव्या गोष्टी लिहिणे सोपे, कारण दु:ख पर्वताएवढे सगळीकडे पसरले आहे. त्यात जवापाडे सुखातून आनंद धुंडाळून हसण्याच्या जागा शोधणे कठीण. त्या शोधत साहित्य प्रसवत राहिलो. बाकी कोणी नसले तरी आमच्या

पुस्तकावरील धुलिकणांचे थर त्यास साक्षी आहेत!

साहित्य निर्मिती ही एक आंतरिक ऊर्मी आहे. आतून जेव्हा साद येते तेव्हा लेखक हाती पेन परजून तत्काळ ॲक्शन घेतो. साहित्य निर्मितीच्या वेणा नि वेदना सहज झेलत तो झरझर लिहित जातो. त्यातून मग कधी काव्य प्रसवते कधी गद्य. जे काही प्रकट होईल ते त्या साहित्याच्या प्राक्तनात असेल त्याप्रमाणे. साहित्याचे प्राक्तन वगैरे चिंतनात्मक भाषा ऐकून कुणीही चिंतित होईल. विशेषतः या पां.तु.पातोळेच्या तोंडून. पण विनोदी झाला तरी लेखकाच्या लिखाणामागे एक बैठक असते. कोणास ती दिसेल, कोणास नाही. कोणी दिसूनही न दिसल्यासारखे करील. पण ती असते. विशिष्ट चिंतनाच्या समुद्र मंथनातून बाहेर पडणारी मौक्तिके गंभीर लेखक वेचत असतो. विनोदी लेखक त्या समुद्रमंथनाच्या प्रक्रियेचाच आनंद घेत तो लुटत असतो. त्यातून बाहेर आलेल्या हलाहलाची ही त्यास गंमत वाटते. त्यातून तो ते प्राशन करणाऱ्या नीलकंठास ब्ल्यू थ्रोट म्हणू शकतो.. नि असली काही असली नावे ठेवून स्वतःवरच खुश होऊ शकतो. मूलगामी विचारवंत साहित्यिक त्या समुद्रमंथनाचा अर्थ

लावत असताना आमच्यासारखे काही त्यातील गंमत शोधत असतात. त्यातून साहित्य जन्मास येते. वाचणाऱ्याच्या चेहऱ्यावरील दोन रेघा हसण्यापुरत्या हलल्या की अशा लेखकाला आयुष्याचे सार्थक झाल्यासारखे वाटते. तिकडे विचारवंत लेखक काळीज हलवण्यासाठी लिहित असतो.. नि आम्ही चेहऱ्यावरच्या दोन चार रेघा! मग त्यासाठी हातातील लेखणी जे प्रसवेल ते साहित्य. यास आम्ही साहित्याचे प्राक्तन म्हणतो. असो. याहून जास्त गांभीर्याचे बेअरिंग आम्हाला नाही वाटत आम्ही घेऊ शकू. तेव्हा पुनश्च आपल्या वेश असावे बावळा अवताराकडे वळावे हे उत्तम.

आज जीवनगौरव पुरस्काराच्या निमित्ताने काही गंभीर बोलण्याचा यत्न केला. अशा पुरस्कार समारंभात तरी थोडा ढुढाचार्यपणा करावा असे आमच्या काही मित्रांनी सांगितले. थिल्लरपणा कमीतकमी या पुरस्काराच्या दिवशी तरी नको असे सौ ने सौ वेळा बजावले. असा सुप्रीम कोर्टाचा आदेश अव्हेरून कोर्टाची मानहानी अतिघातक हे आम्ही स्वानुभवाने जाणून आहोत. तेव्हा हे थोडे गंभीर शब्दातील चिंतन

ओघाने आलेच. त्यास साहित्यिक मूल्य असो किंवा नसो.. त्यास तत्वचिंतनाचा मुलामा असो किंवा नसो.. किंबहुना असे काही नाही याची खात्रीच आहे आम्हाला.. पण ऐकणाऱ्यास तरी काहीतरी तात्विक कोणी बोलतोय.. नि जीवनगौरवास लायक कोणी आहे इतके वाटावे.. इतपत जड बोजड शब्दोपयोग केला आहे. त्यामुळे हा अगदीच कोणी थिल्लर लेखक नाही अशी खात्री पटावी.. आणि या पां.तु.पातोळेची याहून जास्त मागणे नाही..

तर पुनश्च वेश असावा बावळा म्हणत अंतरीच्या ना ना कळा दाखवाव्यात.. या जीवनगौरव पुरस्काराने आम्हास अत्यंत आनंद झाला आहे. त्याचे काय आहे की आज या जीवनगौरवाच्या पुरस्काराने आमच्या कपाटात दर्शनीय असे काही जमा होईल.. कित्येक वर्षांपूर्वी आम्ही आमची बक्षिसे ठेवता यावीत या हिशेबाने कपाटाची सोय करून घेतलेली. आज इतक्या वर्षांनी प्रथमच त्यात दाखवण्यासारखे ठेवावयास काही मिळाले.. परंतु तरीही आम्ही लेखणी अन लेखन कधी सोडले नाही आजवर, यातूनच

आमच्या निष्काम साहित्य सेवेचा अंदाज यावा. असो.

एकूण काय, आजवरच्या लेखनकर्मात विशेष प्राप्ती झाली नसेल.. नसेल म्हणजे नाहीच. अर्थात काही हरकत नाही. पुस्तक लेखकास मानधन देण्याची पद्धती आहे.. आम्हास तसा न मान मिळाला आजवर, ना ही धन. तरीही आम्ही निष्काम साहित्य सेवा सोडली नाही. आमच्या लेखनकामाठीस वेळेचा अपव्यय समजत तोंडच्या वाफेचा व्यय करणाऱ्या आमच्या सुविद्य पत्नी रद्दीवाल्याशी संधान बांधून होलसेल रद्दीसाठी पैसे कमावण्याच्या बेतात असतानाच हा पुरस्कार यावा.. यासारखी सुखद गोष्ट दुसरी नसेल. म्हणजे या निमित्ताने तरी आमच्या घरी आम्हास अंमळ सन्मान मिळेल अशी आशा आहे. असो. ही पुरस्काराची बाहुली आमच्या शोकेसच्या कप्प्यास शोभा आणेल अन आमची अधिक शोभा होण्यापासून आम्हास वाचवेल अशी आमची अटकळ आहे. त्यामुळे हा पुरस्कार आम्हास अगदी वेळेवर प्राप्त होत आहे. देर आए.. दुरूस्त आए म्हणण्याची सोय नाही. कारण आजवर अन्य कसली प्राप्ती नाही. आमच्या सौ.च्या अखंड भडिमाराने बुडणाऱ्या आमच्या

नीतिधैर्याच्या बुडत्या नौकेस ह्या जीवनगौरवाच्या काडीचा आधार.. आणि काय!

तो देणारी 'अतिविशिष्ट साहित्य सेवा' संस्था नि त्यातील संस्थानिक .. नव्हे, त्यातील व्यवस्थापक यांचे हृदयतळापासून आभार मानून अत्यंत नम्रतेने हा पुरस्कार आम्ही स्वीकार करत आहोत. अन्य कोठे नाही तरी या साहित्य सेवा संस्थेच्या वृत्तांतात आमच्या नावाची नोंद होईल.. याचा मनापासून हर्ष व्यक्त करत आम्ही हे आमचे चार..शे शब्द आवरते घेतो..

## परिशिष्ट

*पुस्तकाच्या सुरूवातीस नि शेवटीही.. दोन्ही कडे प्रस्तावना असण्याची ही पहिलीच वेळ! पहिली प्रस्तावना प्रस्तुत संग्रहाच्या परिचयाची नि ही शेवटची.. ही भाषणे (समजा) खरोखरीच केल्यानंतर त्यांचा संग्रह प्रसिद्ध करतानाची!*

# आमच्या भावी भाषणसंग्रहाची प्रस्तावना

*(प्रस्तावनेहून मोठे प्रस्तावनेचे प्रास्ताविक:*

*दिवास्वप्ने पाहणे हा माणसाचा मूलभूत हक्क आहे. जन्मसिद्धही असेल. हे कोणी मोठया माणसाने म्हटले नाही आजवर. कदाचित राहून गेले असेल म्हणायचे. तर,स्वप्ने पाहत बसायला कोणी कोणतीही आडकाठी आणत नाही, आणू शकत नाही. तेव्हा या होतकरू, होऊ घातलेल्या लेखकूस आधी लेखक नि नंतर लेखकराव होण्याची महत्त्वाकांक्षा असेल तर कुणी त्यास दोष देणे अयोग्य ठरेल. म्हणजे आज मी दखलपात्र कुणी नाही. उचलली लेखणी लावली कागदाला असे लेखन दिनरात्र करतो. साभार परतीची पत्रे संपादकांकडून गोळा करण्याचा छंद जडला आहे मला. भारतीय पोस्ट खात्याला खारीप्रमाणे हातभार हे देशसेवेचे व्रत अंगीकारल्यासारखा मी, आज ना उद्या प्रथितयश होणारच. आज लेखणीची करामत दिसत नसेल पण चालवून*

चालवून माझ्या पेनाच्या निबेस धार आल्यावाचून कशी राहिल? थोडक्यात दिल्ली अब दूर नहीं.

.. मग माझ्या कथा नि कविता पानोपानी असतील. दिवाळी अंकांतील माझ्या कथांवर समीक्षा लिहिल्या जातील. साधकबाधक चर्चा होतील. दिवसेंदिवस माझ्या फॅन्सची पत्रे वाचत, त्यांना उत्तर देत फॅन दाक्षिण्य दाखवताना माझी तारांबळ उडेल. माझी पुस्तकांमागून पुस्तके प्रकाशित होतील. त्यांच्या प्रकाशन समारंभात मी प्रकाशात येईन. मग पेपर नि मासिकवाले, एक तरी सदर लिहाच ना आमच्यासाठी म्हणून आग्रह करतील. मी आढेवेढे घेत ते मान्य करेन. त्या सदरातून अजून नवीन पुस्तके जन्मास येतील.. महिनाकाठी येणारा चेक हा बोनस.. सिनेमा नि मालिकावाले माझ्या गोष्टींसाठी मागे लागतील. मी ते हक्क देऊन हक्काने पैसे वसूल करेन. मग त्या सिनेमाची गोष्ट वाचण्यासाठी लोकांची माझे पुस्तक खरेदी करायला झुंबड उडेल. पुस्तक आऊट आ◌ॅफ स्टा◌ॅक होईल. बाजारात मिळत नसल्याने ब्लॅक मध्ये माझी पुस्तके चढ्या दरात विकली जातील.. सरतेशेवटी पुस्तकांच्या तडाखेबंद विक्रीतून झालेल्या मिळकतीवरील कर चुकवल्याचा संशय आल्याने

इन्कम टॅक्सवाले धाड घालतील.. मराठी साहित्यिकाच्या घरावर आयकरवाल्यांची धाड.. सगळीकडे याचा गवगवा होईल. आजवर कोणाही साहित्यिकास न मिळालेला हा मान.. त्यावर माझे सत्कार समारंभ झडतील.. मी आणि आयकर धाड.. माझे सखोल चिंतनात्मक विनोदी पुस्तक मी लिहायला घेईन.. त्यात मग मला कोणा राजकीय व्यक्तीचा वरदहस्त लाभेल. तेवढे झाले की मी अधिकच मोठा होत जाईन. तुका आकाशाएवढा.. कदाचित अशा कोणाच्या आधाराविना झाला असेल. पण नव्या जमान्याच्या नव्या दस्तुरानुसार मोठे व्हायला हे हवेच. एकदा मोठा झालो की साहित्य समेलनाध्यक्षपद वगैरे .. म्हातारपणी आहेच.. लेखकाचा लेखकराव बनावे.. विद्वज्जनांच्या मांडीस मांडी लावून बसावे.. हे मात्र विनोदी लेखकास शक्य नाही. गांभीर्याचा आव आणल्यावाचून विद्वत्ता सिद्ध होत नाही.. पण ते एक असो. एखाद्या लेखकास प्रथितयश होण्याची स्वप्ने पडणे .. किंवा त्याने ती पाडून घेणे.. यात अनैसर्गिक ते काय आहे? असो. कुसुमाग्रजांच्या स्वप्नाची समाप्ती कवितेची आठवण करावी ..

*समाप्ती व्हायला हे स्वप्न मला आजवर पडले नाही. म्हणजे ते पडावे असा आटोकाट प्रयत्न मी करतो.. प्रयत्न म्हणजे.. मी घरात तेल आणण्याचा हुकूम झाला तर एक किलो वाळू आणून प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेल ही गळे ही म्हण ऐकवतो.. म्हणजे प्रयत्नांची पराकाष्ठा म्हणजे काय याचा अंदाज यावा..*

*थोडक्यात हे असे आहे. आज साहित्य शारदेच्या दरबारात हातपाय मारणारा मी.. उद्या प्रसिद्धी पावणारच.. मग गावोगावी व्याख्याने नि दौरे.. त्यात एखाद दोन सत्ताधारी मंत्र्यांशी घसट नि नंतर घनिष्ठ मैत्री .. इत्यादी इत्यादी .. पाठोपाठ उद्घाटने नि भाषणे आलीच. त्या भाषणांचा संग्रह प्रकाशित होईलच.. ती भाषणे तर तयार ठेवलीच आहेत.. आता त्या पुस्तकाची प्रस्तावना ही लिहून तयार आहे.. फक्त स्वप्न एकेका पायरीने पुढे जात राहिले म्हणता झाले..)*

***

# प्रस्तावना

आमचा 'श्रोतेहो..' भाषणसंग्रह प्रकाशित होताना आम्हाला अतीव आनंद होत आहे. आमचे कुत्सित टीकाकार मात्र असा आनंद आमच्या वाचकवर्गास होत आहे का असा कोता प्रश्न उपस्थित करतील अशी आम्हाला खात्री आहे. अर्थात त्यांचे ते कामच आहे. नि अनुल्लेखाने मारण्याहून असे टीकाधनी होऊन चार हात करीत धारातीर्थी पडावे हे बरे! साहित्य समरांगणात आम्ही तशी निलाजरेपणाची कवचकुंडले घालून उतरलो आहोत नि आमचे परममित्र आमदारसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शक्य तितकी गेंड्याची कातडी कमावून आहोत. त्यामुळे आम्हाला असल्या वाकड्या तिकड्या वाक् बाणांची भीती नाही. भय नाही. कोल्हापूरच्या लाल मातीत शड्डू ठोकण्याची लौकिकार्थाने आमची तब्येत नसली तरी शाब्दिक दोन हात मात्र आम्ही लीलया करू इतकी ताकद आमच्या या बोरूत माता शारदेने दिली आहे. त्यामुळे भय इथे आता उरले नाही ही अवस्था आहे.

आमच्या प्रस्तावनेची सुरूवात आम्ही अशी करावी याचे कोणास आश्चर्य वाटल्यास नवल नाही. पण पडलेले पायंडे मोडण्यात आम्ही साहित्यिक कारकीर्द घालवली आणि घडवली. कित्येकांच्या नाकावर टिच्चून आम्ही साहित्य शारदेची सेवा करीत मराठी सारस्वतात स्थिरावलो आहोत. त्यात कित्येक उद्घाटने नि कित्येक संमेलने यांत तात्त्विक भाषणे आम्ही केली आहेत. आमच्या साहित्य सेवेने आम्ही शासन दरबार मान्य साहित्यिक गणले गेले आहोत. जनमान्यता नि राजमान्यता याहून एका लेखकास काय हवे? त्यामुळे आमच्यावर खार खाऊन असणाऱ्यांना तोटा नाही. आमच्या पुस्तकांच्या तडाखेबंद आवृत्तींवर आवृत्ती निघत असताना तोंडात बोटे घालून बसणारे इथलेच आहेत. आम्ही पहिली आवृत्ती मोजून शंभराची काढून दुसरी पन्नासची असे करत आवृत्यांमागून आवृत्या काढतो .. हे खरे असले तरी तितक्या प्रती खपण्यासही नशीब लागते.. हे आमच्या साहित्यिक विरोधकांस कसे कळावे?

जाता जाता एक गंमत सांगतो. हे विरोधक वगैरे म्हटले की राजकारणात शिरल्यासारखे

वाटते. म्हणजे राजकारणाच्या भव्य प्रासादाच्या बाहेरच्या अंगणात आम्ही असू पण आमदार साहेबांच्या कृपेने हे राजकीय शब्द अंगवळणी पडले आहेत. तर ते एक असो.

तर हा 'श्रोतेहो..' संग्रह साहित्य रसिकांच्या चरणी वाहताना आम्हाला हर्ष होत आहे. यात आम्ही विविध प्रसंगी केलेल्या भाषणांचा एकत्रित रसास्वाद रसिकांना घेता येईल. उद्धाटने, शालेय स्नेहसमेलने ते कवि संमेलने, साहित्य संमेलने असा आमचा पंडित मैत्री संचार आहे. तेथे केलेली उद्बोधक भाषणे म्हणजे रसिकांच्या श्रवणेंद्रियांस मेजवानी असे एकदा आमदार पाटील साहेब म्हणालेले आम्हास आठवते. नामदार कोळसे यांनी आपल्या भाषणांपुढे आम्हा पुढाऱ्यांनी काय बोलावे असेही कवतिक केलेले स्मरते. हे सारे आम्ही सविनय सांगत आहोत. आत्मप्रौढीची सवय आम्हास नाही. अर्थात कित्येक हितशत्रू आणिक आमच्यातील न्यून शोधकांस आमच्यात आत्मप्रौढीचा अंश नसण्याबद्दल आम्हीच सांगणे हीच आत्मप्रौढी वाटेल हा भाग अलाहिदा! असो. परंतु 'निखळ सत्य हेच एकमेव सत्य असते' हे आमचेच वचन या बाबतीत आम्हास स्मरते. असो.

ह्या प्रस्तुत संग्रहातील भाषणे आम्ही प्रसंगानुरूप केलेली असली अन कालौघात त्यांचे संदर्भ बदलले तरीही त्यांच्या साहित्यिक मूल्यांत घट होऊ नये असे सुप्रसिद्ध साहित्यिक अन आमचे घनिष्ठ मित्र श्री.अ.दा.अर्चेकर म्हणतात. त्यांच्या 'गर्द पिवळया केतकीचे गुलाबी लाल फूल' या हायकू संग्रहास आम्ही प्रस्तावना लिहून दिलेली त्याप्रसंगी त्यांनी आमच्या मागे लागून हा संग्रह म्हणजे साहित्यिक दस्तावेज होईल असे सांगितले. त्यांनी पिच्छा पुरवल्यानेच हा संग्रह प्रकाशित करण्याचे आम्ही मनावर घेतले. आमचे कधीही मागे न हटणारे प्रकाशक श्री.सदावर्ते यांनी आमच्या मागील पुस्तकांच्या पडून राहिलेल्या प्रतीं बरोबरच या पुस्तकाच्या प्रती खपतील अशी आशा व्यक्त करत पुढाकार घेत हे काम तडीस नेले. त्यांची आशापूर्ती होवो आणिक तुडुंब रसिकाश्रय मिळण्याची आशा आम्हीही करण्यास हरकत नसावी.

बाकी आमच्या साहित्याचा आढावा घेण्याचा हा प्रसंग नाही. तेव्हा अधिक अघळपघळ पुन्हा केव्हातरी. सहस्त्रचंद्र दर्शनाच्या निमित्ताने आम्ही लिहूच, तेव्हा भावी समीक्षकांना मदत होईल ह्या हिशेबाने स्व साहित्य समीक्षा आम्ही लिहू असा

मनसुबा आहे. अर्थात त्यावयात कदाचित आम्ही फक्त एखाद्या मंत्रीपदासाठीच पात्र असू. साहित्य निर्मितीसाठी नसू. हे उमजून आम्ही सारे आधीच तयार ठेवू. आम्ही आजवर न केलेली भाषणे आगाऊ प्रसिद्ध करून आम्ही तो पायंडा पाडला आहेच. त्यात अधिक भर. प्रस्तुत प्रस्तावना पुस्तकाच्या शेवटी घालूनही आम्ही अजून नव प्रथा पाडत आहोतच. नवप्रथाकार पातोळे असे आमचे काही प्रशंसक आम्हास संबोधतात ते उगीच नाही.

ते काही असो, शेवटी साहित्य शारदेची सेवा महत्त्वाची. नव्हे का?

पां.तु.पातोळे

# डॉ. नितीन मोरे यांची


# ३७+२ प्रकाशित पुस्तके

## यांच्या कव्हरवर क्लिक करताच पुस्तक उघडेल.



















डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार



डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार


आधुनिक कहाण्या


डॉ. नितीन मोरे
केळ्याने



ग.आ.च्या (प्रेम) कविता



डॉ. नितीन मोरे
दोन अंक प्रेमाचे



डॉ. नितीन मोरे
मुलीची
'प्रेम'
कथा



डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I



डॉ. नितीन मोरे



राजा दरबारी
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
सांगतो ऐका






डॉ. नितीन मोरे





डॉ. नितीन मोरे








डॉ. नितीन मोरे
घरात



डॉ. नितीन मोरे





डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची 'परी' कथा



डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २
देप, औरंगजेब, अज्ञानेश्वर इ..


Jackson!


सुलट
२७६
डॉ. नितीन मोरे


अंजनीय
डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस


मी मेल्याबिया बोलते
ई बुक
+ऑडिओपुस्तक
+व्हिडिओपुस्तक


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
कानगोष्टी

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष**

**डॉ. नितीन मोरे यांचे हे अडतिसावे पुस्तक.**

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यांच्या विनोदात विखार अजिबात नसतो पण हैराण करणारे चिमटे मात्र असतात आणि त्यातले अनेक ते स्वतःलाच काढतात. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३५), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२२), आनंद

देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(९), श्याम कुलकर्णी(७), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(२), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(२), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या

सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं “इ”यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।